शुक्रवार, २९ डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १३६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 29 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-136 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

आता उरले अवघे तीन दिवस

कोण होणार महाराष्ट्राचा महाकवी !



YouTube

जगातील 10 लाख वाचकांपर्यंत ऑनलाइन जाणारे दैनिक
आधुनिक केसरी
नववर्षानिमित्त घेऊन आले आहे ऑनलाइन
राज्यस्तरीय युट्यूब काव्यवाचन स्पर्धा

दर्जेदार कवींनी जरूर सहभागी व्हावे

अशा पाठवा कविता

कवींनी सुरुवातीला आपला परिचय व नंतर स्वतःची कविता असा व्हिडिओ (जो की 5 मिनिटांच्या कमी व 10 मिनिटांच्यावर नसेल) 7620838883 या नंबरवर पाठवावा.

कवितेचा व्हिडिओ पाठविण्याची अंतिम तारीख 31 डिसेंबर 2023 असेल.

● अशी होईल निवड ●
जनता जनार्धन करणार महाकवीची निवड, सर्व कवींच्या कविता आधुनिक केसरीच्या युट्यूब चॅनलवर प्रसारित होतील. ज्या कवितेला जास्त लाईक येतील तेच होतील महाकवी!

# सत्तेत आल्यास जातनिहाय जनगणना

## राहुल गांधी : नागपूरच्या ‘भारत जोडो’ मैदानात अतिविराट सभा

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर : काँग्रेस सत्तेत आल्यास जातनिहाय जनगणना करेल व देशातील तरुणांना रोजगाराची आवश्यकता आहे ते मोदी सरकार दे देऊ शकत नाही ते काम काँग्रेस पक्षच करेल. आपल्या मदतीने महाराष्ट्रात व देशात परिवर्तन आणू, असा विश्वास खा. राहुल गांधी यांनी व्यक्त केला. काँग्रेसच्या १३९ व्या स्थापना दिनी नागपूरच्या 'भारत जोडो' मैदानात अतिविराट जाहीर सभेला ते संबोधित करत होते.**

ते पुढे म्हणाले की, केंद्रात सत्ता आल्यापासून नरेंद्र मोदी यांनी सर्व सरकारी यंत्रणांवर कब्जा केला आहे यातून मीडिया, निवडणूक आयोग, न्यायालयेही सुटली नाहीत. दरवर्षी २ कोटी रोजगार देण्याचे आश्वास दिले होते पण १० वर्षात मोदींनी किती लोकांना रोजगार दिला? देशात आज ४० वर्षातील सर्वात जास्त बेरोजगारी आहे. नोकरी नसल्याने कोट्यवधी तरुणांची शक्ती वाया जात आहे. शेतकरी, तरुण संकटात आहे तर दुसरीकडे देशातील दोन-चार उद्योगपतींकडे देशातील सर्व संपत्ती सोपवली जात आहे. ओबीसी, दलित, मागासवर्गीयांना सत्तेत, प्रशासनात अत्यंत कमी वाटा मिळत आहे. सर्वच क्षेत्रात या समाज घटकांना कमी स्थान दिले जाते. काँग्रेस पक्षाने जातनिहाय जनगणना करण्याची मागणी केली त्यानंतर मोदींची भाषा बदलली व देशात गरिब ही एकच जात आहे असे ते बोलत आहेत. देशातील सर्व समाज घटकांना सोबत घेऊन जावे लागणार आहे, हीच काँग्रेसची विचारधारा आहे.

यावेळी बोलताना काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे म्हणाले की, देशात सध्या लोकशाही व संविधान धोक्यात आहे, महागाई, बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे. केंद्रातील ३२ लाख सरकारी पदे रिक्त असतानाही मोदी सरकार नोकर भरती करत नाही, मागासवर्गीयांना संधी मिळेल म्हणून मोदी सरकार नोकर भरती करत नाहीत. मोदींना जगभर फिरण्यास वेळ आहे पण संसदेचे अधिवेशन सुरु असताना संसदेत येण्यास वेळ नाही. संसदेत प्रश्न विचारणाऱ्या विरोधी पक्षांच्या १४६ खासदारांना निलंबित करून कायदे पास करून घेतले ही लोकशाहीची थट्टा आहे. लोकशाहीला न जुमनणाऱ्या मोदी व भाजपाला धडा शिकवा असे आवाहन मल्लिकार्जून खरगे यांनी केले. काँग्रेसच्या १३९ व्या स्थापना दिनी नागपूरच्या ‘भारत जोडो’ मैदानात अतिविराट जाहीर सभा झाली. या सभेला राष्ट्रीय अध्यक्ष खासदार मल्लिकार्जून खरगे, माजी अध्यक्ष, खासदार राहुलजी गांधी,



अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस खासदार के. सी. वेणुगोपाल, मुकुल वासनिक, तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सुख्खू, प्रभारी रमेश चेन्नीथल्ला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री सदस्य अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, सुशिलकुमार शिंदे, विधान परिषद गटनेते सतेज बंटी पाटील, गोवा, दिव व दमनचे प्रभारी माणिकराव ठाकरे, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, यशोमती ठाकूर, अमित देशमुख, वर्षा गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, माजी खासदार मिलिंद देवरा, प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, चंद्रकांत हांडोरे, बसवराज पाटील, आ. कुणाल पाटील, आ. प्रणिती शिंदे, संध्या सव्वालाखे, लाखो लोक उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहु महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा असलेल्या भूमीत काँग्रेस स्थापना दिन साजरा होत आहे याचे स्वागत आहे. महात्मा गांधी यांनी याच नागपुरातून हुकूमशाही सत्तेच्या विरोधात नारा दिला व संपूर्ण देशातून जनता एकवटली आणि १५० वर्षांची ब्रिटिशांची हुकूमशाही राजवट संपुष्टात आणली. नागपुरातून याच भूमितून इंदिराजी गांधी यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचा ठराव केला होता. भारताच्या मध्यवर्ती भागात ही सभा होत असून मल्लिकार्जून खरगे व राहुलजी गांधी यांचा संदेश देशात जावा यासाठी ही सभा महत्वाची आहे. हुकूमशाही सत्तेला बाहेर हाकलण्यासाठी, कामगार, शेतकरी, तरुणांना न्याय देण्यासाठी, लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी है तैयार हम, हा संदेश या सभेतून दिला आहे.

## चर्चेतली बातमी

# आंबेडकरांनी सांगितला जागावाटपाचा फॉर्मुला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीतील नेत्यांना पत्र पाठवले आहे. शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, शरद पवार आणि मल्लिकार्जून खरगे यांना त्यांनी पत्र पाठवले आहे. याबाबत त्यांनी ट्विट करत माहिती दिली आहे. वंचित बहुजन आघाडीकडून इंडिया आघाडीला लोकसभासाठी 12+12+12+12 जागेचा फॉर्म्युलाच्या पत्राद्वारे प्रस्ताव दिला. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकांसाठी महाविकास आघाडीच्या तीन घटक पक्षांमधील जागा वाटपाबाबत महाराष्ट्रात वेगवेगळे अंदाज बांधले जात आहेत. या अटकळींचा कितीही गोंगाट सुरू असला, तरी देशातील सर्वाधिक जागा निवडून देणाऱ्या दुसऱ्या क्रमांकाच्या राज्यातील, महाराष्ट्रातील जागा वाटपाबाबत महाविकास आघाडी किंवा इंडिया आघाडीकडून कोणताही ठोस निर्णय होताना दिसत नसल्याचे त्यांनी या पत्रात म्हटले आहे. मोदींना सत्तेतून बेदखल करण्यासाठी 48 जागांचे महत्त्व लक्षात घेता तसेच उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार अशा महत्त्वाच्या राज्यांमध्ये जागा वाटपाबाबत इंडिया आघाडी अंतर्गत असणाऱ्या निर्णयाचा अभाव पाहता वंचित बहुजन आघाडीच्या महाराष्ट्र राज्य कार्यकारिणीने व्यवहार्य व "संघर्षमुक्त" 12+12+12+12 असे सूत्र 26 डिसेंबर 2023 रोजी सुचवले असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. लोकसभेसाठी 12+12+12+12 हे सूत्र आम्ही केवळ मविआ व इंडिया आघाडीत समावेशासाठीच नाही, तर मविआ अंतर्गत सर्व वाद संपवण्याच्याही दृष्टीने प्रस्तावित केले असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

# लोहा तालुक्यातील अंगणवाडी बालकांचा खाऊ निकृष्ट दर्जाचा

## धान्य पुरवठा करणाऱ्या एजन्सीवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी


आधुनिक केसरी न्यूज

मोहन पवार

लोहा : महाराष्ट्र शासनाच्या वतीने महिला व बाल विकास विभाग यांच्यामार्फत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सहा महिने ते तीन वर्षे या बालकांसाठी पोषण आहार म्हणून धान्य पुरवठा केला जातो ते धान्य कंजुबन फॅटरेशन मुंबई या एजन्सी धारकाकडून अतिशय निकृष्ट दर्जाचे मिळत असल्याच्या तक्रारी अनेक गावातून होत आहेत. निकृष्ट दर्जाचे धान्य पुरवठा करणाऱ्या कंजूबन फॅटरेशन एजन्सीवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी लोहा तालुक्यातील जनतेतून केली जात आहे. ग्रामीण भागातील लहान बालकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे ह्या हेतूने महाराष्ट्र शासनाच्या वतीने महिला व बालविकास विभाग यांच्यामार्फत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत गहु, चन्ना, मुगडाळ, साखर, हळद, मिरची पुड, मिठ पुरवठा केला जातो पण ते धान्य कंजुबन फॅटरेशन मुंबई या एजन्सी धारकाकडून अतिशय निकष दर्जाचे धान्य मिळत आहे. लोहा तालुक्यात एकूण ३३८ अंगणवाडी असून २४२ मोठ्या अंगणवाडी तर ९६ मिनी अंगणवाडी आहेत. ६ महिने ते ३ वर्षे असलेली विद्यार्थी संख्या ही ८ हजार ५०० व ३ ते ६ वर्षे विद्यार्थी संख्या ९ हजार आहे. ३ ते ६ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना अंगणवाडी शिजवून पोषण आहार दिला जातो. तर सहा महिने ते तीन वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना कंजूबन फॅटरेशन एजन्सी मार्फत धान्य दिले जाते. यामध्ये प्रतिविद्यार्थी गहु चार किलो, चन्ना दिड किलो, मुग दाळ किंवा मसुर दाळ एक किलो, साखर एक किलो, हळद दोनशे ग्रॅम, मिरची पुड दोनशे ग्रॅम, मिठ चारशे ग्रॅम दिले जाते. पण हे धान्य पुरवठा करणाऱ्या एजन्सी मार्फत अतिशय निकृष्ट दर्जाचे धान्य लोहा तालुक्यातील अंगणवाडी ला पुरवठा केला जातो. असे निकृष्ट दर्जाचे धान्य पुरवठा करणाऱ्या एजन्सीवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी लोहा तालुक्यातील जनतेतून केली जात आहे.


सुनेगाव येथील अंगणवाडीत महिला व बाल विकास विभाग यांच्यामार्फत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना धान्याची वाटप केले गेले ते धान्य अतिशय निकृष्ट दर्जाचे असून चन्ना व मूग डाळीत किडे व आळ्यात आहेत. गहु, हळद, मिरची पुड हे धान्य अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे. लहान बालकांना निकृष्ट दर्जाचे धान्य पुरवठा करणाऱ्या एजन्सीवर कारवाई करण्याची मागणी सुनेगाव येथील संतराम जाधव यांनी केली. एजन्सी मार्फत पुरवठा करण्यात येणारे धान्य हे निकष दर्जाचे असेल तर ते घेऊ नका अशा सूचना तालुक्यातील प्रत्येक अंगणवाडी सेविकांना केल्या असल्याची माहिती महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी पवार यांनी दिली.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# मानवतेचा आणि सेवेचा प्रकाश : डॉ. प्रकाश आमटे



आधुनिक केसरी

परवाच्या दिवशी व्हाट्सअपवर नवीन चित्रपटासंदर्भात एक पोस्ट फिरत होती. सालार, डंकी आणि आणखी असेच काही बॉलिवूडचे मसाला चित्रपट येत असताना प्रेक्षकांनी अस्सल हिरोकडे पाठ फिरवली. हा अस्सल हिरो म्हणजे सॅम बहादूर. सॅम माणेकशॉ हे भारताचे पहिले फिल्ड मार्शल. भारतीय लष्करात चाळीस वर्षे सेवा बजावून आपल्या देशातील जवानांना आणि तरुणांना सेवेचा आदर्श त्यांनी उभा केला. तरुणाईने पाहिलाच पाहिजे असा हा चित्रपट पण हा चित्रपट मी पाहायला गेलो तेव्हा थिएटरमध्ये तुरळक गर्दी होती. पाहणारे बहुसंख्य प्रेक्षक साठी ओलांडलेले होते. असाच एक रिअल हिरो म्हणजे प्रकाश बाबा आमटे. आपल्या वडिलांचा म्हणजेच थोर समाजसेवक बाबा आमटे यांच्या सेवेचा आणि त्यागाचा वारसा पुढे चालवणाऱ्या त्यांच्या विकास आणि प्रकाश या दोन सुपुत्रातील द्वितीय. हा द्वितीय पुत्र तसा एकमेवाद्वितीयच म्हणावा लागेल. बाबा आमटे कुष्ठरोग्यांसाठी कार्य सुरु करतात. एक दिवस आपल्या मुलांसह भामरागडच्या जंगलात सहलीसाठी म्हणून जातात. भामरागडचे जंगल हे जाण्यासाठी अत्यंत गैरसोयीचे. रस्ते नीट नाहीत, दळणवळण सुविधा नाहीत. आरोग्याच्या सोयी तर नाहीतच पण जंगलातील माडिया, गोंड यासारखे आदिवासी तर आरोग्य आणि शिक्षण यांच्याबद्दल काडीचीही आस्था नसलेले. अशा वेळी बाबांना प्रश्न पडतो. मी तर आनंदवनात कुष्ठरोग्यांसाठी कार्य सुरु केलंय पण अशा बिकट ठिकाणी माझ्या आदिवासी बांधवाना कोण सेवा देणार ? त्यांच्या मनातील खंत जाणून घेऊन नुकताच डॉक्टर झालेला प्रकाश म्हणतो, ' मी करीन इथे काम. ' बाबांच्या चेहऱ्यावर आनंद झळकतो.



## आनंदी पहाट

# आयुष्यभर स्वतःला शिक्षित करणे थांबवू नये

आधुनिक केसरी

आत्मविश्वास, अनेक गोष्टींप्रमाणे, एक कौशल्य आहे, जे शिकून आत्मसात करता येते, विकसित करता येते. जरी आत्मविश्वासाने सुरुवात केली नाही, तरीही आपण जितका सराव करू तितके चांगले आपल्याला मिळेल आणि त्यायोगे अधिक आनंद मिळेल. आपल्या आयुष्यात नेहमीच सकारात्मक विचार करावा. अडथळ्याचा सामना करताना, स्वतःला सांगावे की आपण त्यावर मात करू शकतो. आपल्याला आत्मविश्वास वाटत नसला तरीही, देहबोलीसह आत्मविश्वासाने वागण्याचा प्रयत्न करावा. आपण चालत असताना किंवा बसलेले असताना सरळ कायम ताठ राहावे. केवळ आपले हसणे देखील हसण्यासाठी सक्ती केली तरीही, आपल्याला ती त्वरित आनंदी आणि अधिक आत्मविश्वास वाटण्यास मदत करू शकते. नकारात्मक विचार करणे थांबवावे. स्वतःला अनेक बाबींची शंका असणे सामान्य आहे, परंतु आपण त्यावर मात करू शकतो, जे सर्वप्रथम समजून घेतले पाहिजे. प्रत्येक वेळी जेव्हा आपण स्वतःबद्दल नकारात्मक विचार सुरू करतो, तेव्हा स्वतःला थांबवावे आणि विचार पुन्हा सकारात्मक किंवा तटस्थपणे करण्यास सुरुवात करावी. उदाहरणार्थ, जर आपण स्वतःला मी अनेक बाबतीत खूप अपात्र आहे असा विचार करत असू, तर त्याऐवजी असा विचार करावा कि, मी स्वतःसाठी आणि इतरांसाठी खरोखरच खूप मौल्यवान आहे. आयुष्यभर स्वतःला शिक्षित करणे कधीही थांबवू नये. हे आपला मेंदू तीक्ष्ण ठेवेल, अल्झायमर सारख्या आजारांचा धोका कमी करेल आणि इतर लोकांशी चर्चा करण्यासाठी आपल्याला मनोरंजक गोष्टी देईल. व्हिडिओ गेम डिझाइन किंवा ऐतिहासिक पोशाख यांसारख्या आपल्यासाठी स्वारस्य असलेल्या विषयांसह प्रारंभ करावा. जगात काय घडत आहे, याबद्दल स्वतःला शिक्षित करावे. विज्ञान, औषध, राजकारण, कला आणि वर्तमान घटनांमध्ये प्रगती होत असल्याचे आपल्याला माहिती असणे आवश्यक आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## चौऱ्यांशीचा घाट | सोपा झाला ||

काय सांगु सुख | संत दर्शनाचे ||
भाव अंतरीचे | शांत झाले ||१||
पाहिला शोधोनी | सुखाचा विसावा ||
लटका दिखावा | संसारात ||२||
मीपणाची बाधा | सुटता सुटेना ||
म्हणूनी भेटेना | सुख शांती||३||
जडू नये आता | आणिकांचा संग ||
समाधीचा भंग | होऊ नये ||४||
संत समागमी | सापडली वाट ||
चौऱ्यांशीचा घाट | सोपा झाला ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी

असो ऐसी वाट पाहतां । दृष्टीं देखिला अवचिता ।
मुलें धावती, ताता । भागलास म्हणौनी ॥ २१ ॥
स्त्री देखोन आनंदली । म्हणे आमुची दैन्यें फिटली ।
तंव येरें दिधली । गांठोडी हातीं ॥ २२ ॥
सकळांस आनंद जाला । म्हणती आमुचा वडील आला ।
तेणें तरी आम्हांला । आंग्या टोप्या आणिल्या ॥ २३ ॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

निजाभ्यास ज्यों ज्यों बढ़े,
त्यों त्यों थिर मन होय ।
आत्मिक बल दिन दिन बढ़े,
कृशित गात द्युति होय ।।१४७।।
मधुर मधुर अनहद ध्वनि,
उठत सदा दिन रैन ।
सुनि सुनि उमगत प्रेम उर, शांति वृद्धि
चित चैन ।।१४८।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल
षष्ठ अध्याय) ०६/०६/१४७, १४८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : साधकाचा योगाभ्यास जसजसा वाढू लागतो, तसतसे त्याचे मन स्थिर होऊ लागते तथा आत्मबल उत्तरोत्तर, प्रतीदिन वृद्धिंगत होऊ लागते. साधन काळात साधकाचे शरीर बारीक होते, तरीही त्यात एक विशेष प्रकारची कांती आणि चमक दिसून येते. साधकाला रात्रंदिवस मधूर अनहद ध्वनी ऐकू येतात, जे ऐकून-ऐकून ह्दयात प्रभूप्रेम वाढू लागते. मनात शांती आणि चित्तात स्थिरता उत्पन्न होऊन ती वृद्धिंगत होते.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

# सुख स्वत:वरच अवलंबून आहे

आधुनिक केसरी



सुखाचा उगम आपल्यातच आहे. ते जगाकडून मिळत नसते. मनुष्य जगाकडून सुख मिळविण्याचा प्रयत्न करतो, पण ते त्याला मिळत नाही. याचे कारण असे की, सुख बाहेरून मिळवायचे नसून स्वतःकडून मिळवायचे असते. आपण आहो तिथपर्यंत जग आहे अशा अर्थाची म्हण आहे. जगाचे अस्तित्व आपल्या अस्तित्वावर अवलंबून असते. समजा, आपल्या घरात विजेचे दिवे आहेत; ते बटण दाबल्याबरोबर लागतात. पण जर का त्या विजेच्या उगमाच्याच ठिकाणी बिघाड झाला तर घरातले बटण दाबून दिवे लागणार नाहीत. फार काय, पण घरातील दिव्याची दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केला, तरी मूळ ठिकाणच्या बिघाडाची दुरुस्ती होईपर्यंत काही उपयोग होत नाही. त्याप्रमाणे आपल्या स्वतःमध्येच सुधारणा झाल्याशिवाय बाहेरून सुख मिळणार नाही. समुद्र सर्व पृथ्वीच्या पाठीवर दूरवर पसरलेला आहे, पण असे कधी झाले आहे का, की अमुक एका ठिकाणचे पाणी कमी खारट आहे ? तसे, जगात कुठेही गेले तरी सुखाच्या बाबतीत अनुभव सारखाच येणार. म्हणजे, सुख जगावर अवलंबून नसून स्वतःवरच आहे. त्याला उपाय म्हणजे स्वतःचीच सुधारणा करणे हा आहे. आता ही सुधारणा कशी करायची ? ईश्वराने मनुष्याला बरेवाईट जाणण्याची बुद्धी दिलेली आहे. ती इतर प्राण्यांना नाही. त्या बुद्धीचा पुरेपूर उपयोग करून, आपण वाईट गोष्टी करण्याचे टाळावे आणि चांगल्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करावा. वाईट गोष्ट टाळणे प्रत्येकाला शक्य आहे, कारण त्यात कृती न करणे एवढेच काम असते, आणि ते कृती करण्यापेक्षा केव्हाही सोपेच. चांगल्या गोष्टी सर्वांनाच करता येतील असे नाही. सारांश, सुखी होण्याचा मार्ग म्हणजे वाईट गोष्टी करण्याचे विचाराने टाळावे आणि चांगल्या गोष्टी शक्त्यनुसार करीत राहाव्या; आणि हे सर्व करताना सर्वकाळ भगवंताचे चिंतन करावे. असे केल्यानेच सुख मिळेल. जगाकडून सुख मिळेल, ही कल्पनाच चुकीची आहे. 'तुझे आहे तुजपाशी । परि तू जागा चुकलासी ॥ ' आपण स्वतः जगासारखे वागत नाही किंवा भगवंतासारखेही वागत नाही, मग जगाने आपल्यासारखे वागावे असे आपण का म्हणावे ? गीतेमध्ये भगवान सांगतात की, ' मन हे मीच आहे. ' भगवंतावाचून मनाची तयारी होणार नाही. म्हणून आपण भगवंताला घट्ट धरावे, आणि मग समाधानात राहावे. भगवंताचे सदासर्वकाळ स्मरण ठेवावे आणि वृत्ती स्थिर राखावी. वृत्ती स्थिर झाली की त्याच्या मागोमाग समाधान येतेच येते.

२३४. आपल्याला हव्या त्या गोष्टी देण्यामध्ये भगवंताची खरी कृपा नसून, असेल त्या परिस्थितीमध्ये आपले समाधान टिकणे ही त्याची खरी कृपा होय.

## ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

आयुष्य जगत असताना आपल्याला हरघडी वेगवेगळे अनुभव येत असतात. कधी चांगले तर कधी अतिशय मनस्ताप देणारे. ह्दयाच्या बंद कप्प्यात जपून ठेवावे तर काही अनुभव ह्दय हेलावून टाकणारे असतात. तर काही अनुभव एवढे भितीदायक असतात. की ते ह्दय बंदही पाडू शकतात. असे अक्राळविक्राळ अनुभव प्रत्येकाला थोड्याफार प्रमाणात सर्वांना येतात. आणि अशा सर्व अनुभवाला धैर्याने शांत मनाने सामोरं जाण्यासाठी तुमच्या विचारांची दिशा परमात्म स्वरूप असायला हवी. मित्रांनो संतज्ञानेश्वर जगत् गुरू तुकाराम महाराज यांना सुध्दा समाजातील प्रत्येक घटका कडून काही प्रशस्तिपत्र मिळाले नाही. खूपच हाल अपेष्टा सहन करत ते अजरामर झाले आहेत.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## जनार्दन स्वामी

आधुनिक केसरी

भारतीय संस्कृतीचा संत आणि दैवी पुरुषांशी अनादी कालापासून संबंध आहे.भारतीय इतिहासाची पाने ह्या मानवजातीच्या रक्षण कर्त्यांच्या स्तुतीने व आळवनीने भरलेली आहेत. महाराष्ट्रात फार मोठी संत परंपरा लाभली आहे. त्यात प्रामुख्याने संत तुकाराम,संत ज्ञानेश्वर ,संत एकनाथ, संत रामदास स्वामी, स्वामी गजानन महाराज,साईबाबा हे तर त्या परंपरेतील भूषण आहेत. ह्याच परंपरेतील दुसरे नाव म्हणजे श्री राष्ट्रसंत सद्गुरू जनार्दन स्वामी (मौनगिरी) महाराज होय.




**ऑनलाईन वस्तू घरपोच मागवताना... !** पान ६


# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, २९ डिसेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


# कडाक्याच्या थंडीतही शाळा सकाळीच; शिक्षण विभाग मात्र गाढ झोपेतच

## अपुऱ्या झोपेमुळे, विद्यार्थ्यांना शिकवणीच्या तासांमध्ये डुलकी

आधुनिक केसरी न्यूज



**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यात गेल्या महिनाभरापासून वातावरणामध्ये गारठा खूपच वाढलेला आहे. थंडीचा कडाका एवढा आहे की, सकाळी साडे आठ ते नऊ पर्यंत रस्त्यावर माणसांचा वावर जास्त प्रमाणात नसतो. कडाक्याच्या थंडीमुळे माणूस सकाळी घरा बाहेर पडायला टाळत आहे. मात्र लहान चिमुकल्यांच्या शाळा मात्र एवढ्या कडाक्याच्या थंडीतही सकाळी आठ च्या अगोदर भरवण्याचा अट्टाहास का केला जातो, हे मात्र काही समजायला मार्ग नाही.

शिक्षण विभागाला ही बोचरी थंडी जाणवत नाही का? कारण लहान मुलांना सकाळी सातची शाळा म्हटलं की, सकाळी सकाळी साडे पाच सहा वाजता उठून अंघोळ गणवेश शालेय दप्तर,साहित्य याच्या तयारी लागावं लागत आहे. या कडाक्याच्या थंडीमध्ये मुलांसोबत पालकांचीही हुडहुडी वाढत आहे. कारण महिलांना सकाळी उठून लेकरांचा डबा करणे तर पालकांना लेकरं शाळेतून सोडणे खूप जिकरीचे होत आहे. जिल्हाभरातील बहुतांश पूर्व प्राथमिक व प्राथमिक) शाळा सकाळी सातच्या आसपास भरतात. तर पालकांना मुलांची तयारी करण्यासाठी पहाटे पाच वाजताच उठावे लागते. या सर्वांत मुलांची झोप पूर्ण होत नाहीच; शिवाय पालकांनाही धावपळ करावी लागते. या पार्श्वभूमीवर शाळांच्या सकाळच्या वेळा बदलण्याबाबत प्राथमिक शाळा मुख्याध्यापकांची बैठक ही झालेली आहे. मुख्याध्यापकांनी शाळेच्या वेळ बदलाबाबत गटशिक्षण अधिकाऱ्यांनी कळविले आहे,पालकांकडूनही कडाक्याच्या थंडीमुळे शाळेच्या वेळेत बदल करण्याबाबत आग्रही आहेत. सध्या सकाळच्या सत्रातील शाळा सात वाजताच्या आसपास भरत असून, ही वेळ नऊपर्यंत पुढे नेल्यास मुलांची झोप पूर्ण होऊन शिकण्यात लक्ष लागेल. पालकांची सकाळी पाच वाजल्यापासून होणारी धावपळ कमी होईल, अशी भूमिका पालकांकडून मांडण्यात येत आहे. कारण अनेक मुलांचे आई-वडील नोकरी करणारे असल्याने त्यांच्या कामावरून घरी परतण्याच्या वेळाही रात्री उशिराच्या असतात. अशा वेळी स्वाभाविकपणेच सर्व कुटुंबाला झोपायला उशीर होतो. हे फक्त शहरापुरते नाही, तर खेड्यापाड्यातसुद्धा रात्री ११ किंवा त्यानंतर झोपणे अगदी दैनंदिन झाले आहे. शाळेत जाण्यासाठी म्हणून मुलांना सकाळी लवकर उठवले जाते. अशा वेळी मुले शाळेतच शिकवण्याच्या तासांमध्ये झोपेच्या डुलक्या मारतात, त्यामुळे शिक्षकांच्या शिकवण्याकडे त्यांचे लक्ष राहत नाही.

त्याचा परिणामहा शिक्षकांनी शिकवल्या नंतर विद्यार्थ्यांच्या आकलनावर होतो. त्यामुळे शिक्षण विभागाने लवकरात लवकर शाळेतील वेळेत बदल करून विद्यार्थ्यांची झोप पूर्ण होऊन, कडाक्याच्या थंडीमध्ये त्यांचे मानसिक तसेच शैक्षणिक आरोग्य सुधारण्यासाठी लक्ष घालावे अशीच भावना जिल्ह्यातील पालकांमधून बोलली जात आहे.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांकडून शासनाच्या परिपत्रकाची होळी

आधुनिक केसरी न्यूज




**सुलतानपूर :** ता. खुलताबाद आय.सी. डी.एस आयुक्त रूनल आग्रवाल यांच्या निषेधार्थ आयटक प्रणित अंगणवाडी कर्मचारी युनियनच्या वतीने बुधवार दि.27 रोजी तालुक्यातील 150 कर्मचाऱ्यांनी गदाणा येथील ग्रामपंचायत कार्यल्यावर मोर्चा काढून निर्दशने करण्यात आली. या वेळी अंगणवाडी कर्मचाऱ्यानी आय. सी. डी.एस आयुक्त यांनी 22 डिसेंबर रोजी काढलेल्या पत्राची होळी केली. दरम्यान या वेळी ग्रामसेवक गंगाधर गायकवाड यांना निवेदन देण्यात आले या निवेदना मध्ये मा. आय.सी.डी.एस.आयुक्त श्रीमती रुबल आग्रवाल हे कर्मचाऱ्यां मध्ये दहशत निर्माण करून संप फोडण्याचा प्रयत्न करत असून अंगणवाडी सेविकेच्या कामासाठी तातपुरत्या स्तरावर च्या कामासाठी ग्रामपंचायत कर्मचारी, बचत गट,आशा स्वयंसेविका,शालेय पोषण आहार कर्मचारी यांच्यावर जबाबदारी देण्याचे आयुक्त रुबल आग्रवाल देत आहे.. ही कामे आखरीत्या येणाऱ्या कर्मचाऱ्यांना देऊ नये. अशी विनंतीचे निवेदन निर्दशने करून ग्रामसेवक,मुख्यध्यापक, वैद्यकीय अधिकारी यांना देण्यात आली.या वेळी गीता पांडे, जयश्री डिवरे, सुरेखा मोरे, परिगा वाहूळ पुष्पा वैद्य,नंदा लिंगायत,लता जाधव, लता बोडखे, सुशीला गोरे,आशा दाभाडे, भीमाबाई निळं,हिरा जाधव, अलका आव्हाड,सुनीता खेळवणे,पल्लवी माळी, निर्मला जाधव आदीची उपस्थिती होती.

जेलभरो आंदोलनचा इशारा, दरम्यान आयुक्त रुबल आग्रवाल यांच्या विरोधात 1 जानेवारी रोजी जिल्हापरिषद समोर 5 हजार कर्मचारी जलभरो आंदोलन करतील असा इशारा ही आयटकच्या वतीने देण्यात आला आहे.

# किल्ल्यांचे संवर्धन स्वत: करू : संभाजीराजे छत्रपती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील शिवकालीन ३५० किल्ल्यांचे संवर्धन करण्यास ' फोर्ट फेडरेशन' ही संस्था तयार आहे. यातील २५ किल्ले तर व्यक्तिगत पातळीवर संवर्धनासाठी द्यावेत अशी मागणी केंद्र आणि राज्य सरकारच्या पुरातत्त्व विभागाकडे तसेच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे केली आहे. पण त्याकडे दुर्लक्ष केले जाते. गड- किल्ले संवर्धनासाठी जिल्हा नियोजन समितीतून तीन टक्के रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला पण त्याची अंमलबजावणी काही झाली नाही. त्यात अनेक लालफितीच्या अडचणी आहेत. त्यामुळे किल्ले संवर्धनासाठी अनेकांना देता यावेत, त्याच्या संवर्धनाची एक मार्गदर्शिका पुरातत्व विभागाच्या वतीने करावी, अशी मागणी करुनही फारसा उपयोग झाला नाही, अशी खंत छत्रपती संभाजीराजे यांनी व्यक्त केली. छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांशी बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५० राज्यभिषेक सोहळा आयोजित करताना सागरी किल्ल्यांची सफर घडवून आणारे पर्यटन घडवून आणणारी योजनाही तयार आहे. पण त्याकडेही कोणी लक्ष देत नाही.



# आकाश सोनवणे यांची धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघात बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या निवडणुकीत दै. आधुनिक केसरीचे धुळे जिल्हा प्रतिनिधी आकाश सोनवणे यांची कार्यकारी सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाल्याने त्यांचा अनेक ठिकाणी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे व सत्कार करण्यात आला.या ठिकाणी ग्रामीण आमदार मा.कुणाल पाटील व राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस इर्शाद भाई जहागीरदार यांनी पत्रकार भवन येथे येऊन सत्कार करण्यात आला व दाऊशेठ चौधरी, चेतन भाऊ गवळी व त्यांच्या सर्व मित्र परिवाराने शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.




# संकल्प पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करूया...!

आधुनिक केसरी

*मित्रांनो, आपण २०२३ मधून २०२४ मध्ये पदार्पण करीत आहोत. सर्वसाधारण नवीन वर्षाच्या शुभेच्छा एकमेकांना देत असतानाच आपण आपल्या मनाशी काही गोष्टी ठरवत असतो.नवे वर्ष नव्या आशा,नवे संकल्प घेऊनच आपण या वर्षात पदार्पण करीत असतो. मागील वर्षाचा अनुभव लक्षात घेऊन त्या वर्षात आपल्याकडून काय निसटले, काय करायचे राहून गेले याचा आढावा खरं तर आपले मन नकळतपणे घेतच असते.शालेय जीवनात आपल्याकडून नव्या वर्षात आणखी काय चांगले घडेल यासाठी नवे संकल्प मनाशी ठरवत असतो. दरवर्षी ही प्रक्रिया होतच असते. मात्र वर्षांच्या सुरवातीला केलेले संकल्प काही दिवसातच हवेत विरून जातात.आपण जे ठरविले होते ते न होण्यासाठी आपण लंगड्या सबबी मग पुढे करतो.वेळच मिळाला नाही, अभ्यासच खूप होता असे म्हणतच विविध समारंभात आपण मश्गुल होतो आणि बघता बघता वर्ष संपते. मग आपण येणाऱ्या नव्या वर्षासाठी पुन्हा नवे संकल्प आखतो.मात्र या वर्षी आपण निश्चयच करू यात की आपण आपले संकल्प या वर्षात नक्की पूर्ण करूयात.*



सुदाम कृष्णाजी विश्वे
संपर्क क्र. ९८६०५६६१४७

*आज मी तुम्हाला असे काही संकल्प सांगणार आहे की ते ते पूर्णतर होतीलच ; पण यासाठी तुम्हाला अधिकचा वेळही फारसा लागणार नाही.चला तर मग काही नवे संकल्प पाहुयात.*

** स्क्रीनटाइम कमी करू या : आपल्याला लागलेली मोबाईलची सवय व मोबाईलचा वापर खूपच वाढला आहे.येणाऱ्या नवीन वर्षात आपण मोबाईल चा हट्ट धरला नाही पाहिजे.थोडा का होईना आपला स्क्रीनटाइम कमी करण्याचा संकल्प आपण या नवीन वर्षांच्या सुरवातीलाच करू यात.अगदीच आवश्यक असेल तेव्हाच मोबाईल वापरू.*

** लेखन,वाचन वाढवूया : आपण जर निश्चय केला व रोज नियमित लेखन करायला सुरुवात केली तर आपला लेखन वेग पूर्वीपेक्षा नक्कीच वाढेल. रोज दोन तीन पाने आपल्या कडून लिहून झालीच पाहिजेत.वाचनाच्या बाबतीतही आपण प्रयत्न करायला हवेत.अभ्यासासाठी लागणारी बैठक आपणास मारावी लागणार आहे.*

** थोडासा व्यायाम करूया : आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी आपल्याला थोडासा व्यायाम करायलाच हवा. सूर्यनमस्कार, थोडेसे जॉगिंग, कधी सायकल चालविली तर कधी थोडासा फेरफटका मारायला सुरुवात आता करायला हवी. हा खेळापूर्वीचा वॉर्मअप च म्हणाना. या वर्षात होणाऱ्या स्पर्धा परीक्षेमध्ये आपल्याला भाग घ्यायचा आहे हे ठरवून नवीन वर्षात आपणाला फिट राहण्यासाठी वेळ द्यावाच लागणार आहे.*

** रोजनिशी ( डायरी ) लेखन करू या : आज आपण दिवसभरात काय काय केले,कोणत्या विषयाचा किती अभ्यास केला, कोणत्या विषयाचा अभ्यास राहिला,आज दिवसभरात आपल्या कडून कोणते चांगले काम झाले,आपली एखादी चूक तर झाली नाही ना,परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी आपण काय उपाययोजना केल्या ,आज आपण कोणते अवांतर पुस्तक वाचले ते कसे होते,दिवसभरातील कोणती बातमी आपणास आवडली,मित्रांबरोबर आपण काय चर्चा केली असे सर्व आपण झोपायच्या पूर्वी आपल्या वैयक्तिक डायरीत नोंदवायला हवे.आता तुम्ही म्हणाल एवढे सर्व लिहायचे तर खूप वेळ लागेल.पण हे लेखन आपण संक्षिप्त स्वरूपात करायचे आहे.एखाद्या दिवशी तुम्हाला वाटले आज काही लिहिण्यासारखे नाही तर त्या दिवशी नाही लिहिले तरी चालेल.डायरी लेखनामुळे आपण नक्की काय अभ्यास केला ते आठवावे लागत नाही. मागच्या नोंदी पाहून आपल्याला समजते की आपण नेमके कुठे आहोत.*

**छंद जोपासू :आपल्याला एखादा छंद असेल तर तो जोपासू. गायन,वादन,चित्रकला,आवडणाऱ्या लेखकांच्या अवांतर पुस्तक वाचनातून मिळणारी ऊर्जा आपल्याला उपयोगी पडणार आहे.*

*हे काही ढोबळ मानाने संकल्प मी सांगितले आहेत. यात आपण भर ही घालू शकता.सर्वच गोष्टी प्रत्येक दिवशी व्हायलाच हव्यात असे देखील नाही.पण आपले मुख्य उद्दिष्ट म्हणजे आपल्याला येणाऱ्या परीक्षेत चांगल्या पद्धतीने उत्तीर्ण व्हायचे आहे.म्हणूनच या नव्या वर्षात जाताना आपणाकडून हे संकल्प केले गेले व ते पाळले गेले तर येणारे वर्ष आपणासाठी खूप सुंदर असणार आहे.*



# भारताच्या प्रयत्नांना यश!

आधुनिक केसरी

कतारमध्ये एका खासगी कंपनीत काम करणाऱ्या भारताच्या आठ माजी नौदल अधिकाऱ्यांना कतारमधील एका कनिष्ठ न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली होती. परंतु, ही शिक्षा आता रद्द करण्यात आल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली असल्याचे वृत्त पीटीआयने दिले आहे. कतारमधील यंत्रणेने त्यांना ३० ऑगस्ट २०२२ रोजी अटक केली होती. या वर्षी २९ मार्च रोजी त्यांच्याविरोधातील खटल्याच्या सुनावणीला सुरुवात झाली. त्यानंतर नौदलाच्या आठ माजी अधिकाऱ्यांना कतारच्या न्यायालयाने २६ ऑक्टोबरला हेरगिरीच्या आरोपावरून मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. भारताने याची गांभीर्याने दखल घेऊन अधिकाऱ्यांच्या बचावासाठी कायदेशीर उपाय सुरू केले होते. शिक्षेला आव्हान देण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती सरकारतर्फे गेल्या आठवड्यात देण्यात आली होती. या अपिलाचा सकारात्मक परिणाम होईल अशी आशाही भारताकडून व्यक्त करण्यात आली. कॅप्टन नवतेजसिंग गिल, कॅप्टन सौरभ वसिष्ठ, कमांडर पुरेनेन्दु तिवारी, कॅप्टन बिरेंद्र कुमार वर्मा, कमांडर सुगुनाकर पकाला, कमांडर संजीव गुप्ता, कमांडर अमित नागपाल व खलाशी रागेश अशी या कर्मचाऱ्यांची नावे आहेत. हे सर्व भारतीय अल दाहरा ग्लोबल टेक्नॉलॉजिस अ‍ॅण्ड कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या संरक्षण सेवा पुरविणाऱ्या कंपनीत काम करीत होते. रॉयल ओमान एअर फोर्समधून निवृत्त झालेले वैमानिक व ओमानी नागरिक खमिस अल अजमी यांच्या मालकीची ही कंपनी आहे. या आठ भारतीयांसह त्यांनाही अटक करण्यात आली होती. मात्र, नोव्हेंबर २०२२ रोजी त्यांची सुटका करण्यात आली. आठही जणांना कतारी गुप्तचर यंत्रणा स्टेट सिक्युरिटी ब्युरोने अटक केली होती; ज्याची माहिती सप्टेंबरच्या मध्यात भारतीय दूतावासाला देण्यात आली. ३० सप्टेंबरला प्रथमच त्यांना कुटुंबातील सदस्यांशी दूरध्वनीद्वारे बोलण्याची परवानगी देण्यात आली. त्यांच्या अटकेनंतर जवळपास महिनाभराने ३ ऑक्टोबरला भारतीय दूतावासातील अधिकाऱ्यांना आठही भारतीयांना भेटण्याची परवानगी देण्यात आली. पुढचे काही महिने या नौसैनिकांना आठवड्यातून एकदा कुटुंबीयांशी दूरध्वनीवर बोलण्याची परवानगी देण्यात आली होती.
या आठ भारतीय माजी नौसेना अधिकाऱ्यांवर काय आरोप ठेवण्यात आले, याची माहिती अद्याप सार्वजनिक केली गेलेली नसली तरी त्यांना वेगवेगळ्या खोल्यांमध्ये एकांतवासात बंदिस्त केल्यामुळे हे प्रकरण सुरक्षेशी संबंधित असल्याचा अंदाज बांधण्यात येत आहे.



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

# खा.संजय राऊतांनी कर्णपुराण वाचायला हवं

आधुनिक केसरी

**आयोध्येत उभा राहिलेल्या प्रभु रामचंद्र मंदिर बांधकामासाठी उबाठा शिवसेनेने 01 कोटी रूपये दिल्याचे वारंवार खा.संजय राऊत जाहिर प्रगटन राजकिय स्वार्थापोटी करू लागले खरं तर कुठलंही दान केलं तर त्याचं उच्चारण केल्या जात नाही तो पुण्यकर्माचा भाग असतो. हिंदु धर्मात दान धर्म गुप्त पेटीत टाकल्या जातं. तीर्थक्षेत्र बालाजीच्या हुंडीत भाविक दान टाकतात. त्याचा उल्लेख कुणी करत नाही. एव्हाना पुरातन काळात शुरवीर कर्णाने ज्याला दानशुर म्हणता येईल.**

कवचकुंडले दान करून देखील उच्चार केला नाही. दान द्यायचं आणि हागुन काढायचं ज्याला पापकर्म असं म्हणता येईल. पण राजकिय स्वार्थाची पट्टी डोळ्यावर आल्यानंतर देवाला दिलेले दान जाहिरपणे काढणं याचाच अर्थ स्वतःचं भविष्य तथा पक्ष नेत्याचे भविष्य रसातळाला घालणं असंच म्हणावे लागेल. एक तर 01 कोटी दिले म्हणणाऱ्या संजय राऊतांनी अद्याप त्याचा पुरावा जनतेसमोर कधीच सादर केला नाही तो भाग वेगळा. पण मंदिर सोहळ्याला बोलावलं नाही तो राग काढण्यासाठी 01 कोटीचा उच्चार हे बरं नव्हं, हे राऊतांनी लक्षात घ्यायला हवं. मंदिर बांधकामाला कोटीच्या दानाची साक्ष तुम्ही देता मग सत्तेत असताना तुम्ही घेतलेलं गुप्त दान जनतेला सांगा की हो...तुमचे मंत्री 100 कोटीच्या दानात गृहमंत्री असताना जेलमध्ये होते हे लक्षात घ्या.
उद्याच्या 22 जानेवारीला देशाच्या अध्यात्मिक इतिहासात सुवर्ण अक्षराने लिहुन ठेवावं असा दिवस येतोय तो म्हणजे प्रभु रामलल्लाची मुर्ती प्रतिष्ठापना सोहळा. चार-पाचशे वर्षानंतर अस्मितेचं स्वप्न साकार होतंय प्रत्येक हिंदु धर्मीयांची मान कॉलर टाईट करणारा तो दिवस असेल. संपुर्ण देशात सोहळ्याची तयारी जोरदारपणे सुरू असताना महाराष्ट्रात राजकिय आरोप-प्रत्यारोप विशेषतः उबाठा पक्षाकडून होताना दिसतात. ठाकरे शिवसेनेचे मुख्य प्रवक्ते खा. संजय राऊतांनी एक कोटी रूपये दान दिल्याचे जाहिरपणे वारंवार सांगितले. प्रश्न असा पडतो की, एक तर दान हे कर्म गुप्त पद्धतीचे ज्याचे उच्चारण होवु शकत नाही. हिंदु धर्मात विशेषतः संस्कृतीमध्ये एक कोटी नव्हे तर विविध देशातल्या मंदिर बांधकामाला हजारो कोटी रूपये देणारे दाते याच मातृभुमीत ज्यांनी कधीच दानाचा उच्चार केला नाही. अनेक वर्षे मागे वळुन पाहिलं तर महाभारतात देखील कर्णाला दानशुर कर्ण म्हणुन ओळखल्या जाते. ज्याने स्वतःजवळ जे आहे ते दुसऱ्याला देण्याचा प्रयत्न केला. कवच कुंडलं देखील दान करून टाकली. कदाचित केले नसते तर महाभारत वेगळ्या वळणावर गेलं असतं. पण या कर्णाने कधी कुठे दान केल्याचे उच्चारण ऐकण्यात आलं नाही. खरं तर संजय राऊतांनी कर्णपुराण वाचण्याची गरज वाटते. दान हे पुण्यकर्म म्हणुन





ओळखल्या जाते. पण केलेले दान कुणी हागुन काढत असेल तर त्यापेक्षा पाप दुसरं नाही आणि या पापाच्या भरल्या घडात संजय राऊत आणि त्यांचा पक्ष अंतिम टप्प्यात प्रवेश करतो असल्यासारखं सद्या तरी दिसुन येतं. ज्यांनी राम मंदिराला एक कोटी रूपये दिल्याचा उच्चार जाहिरपणे करून महापाप केलं. वास्तविक पहाता या कोटी दानाचा अद्याप तरी एकही पुरावा राऊतांनी लोकांना दिला नाही ?एक कोटी धनादेश दिला तोही कुणी पाहिला नाही. मंदिर ट्रस्टची पावती असेल ती पण कुणाच्या डोळ्यास पडली नाही? रोज सकाळी माध्यमासमोर येवुन राजकिय बनवाबनवी करण्यासाठी राऊत जसे वस्ताद म्हणुन ओळखल्या जातात. कदाचित कोटीच्या दानाचा प्रकार तोच असावा हा प्रकार बळावत चाललेला दिसतो. राहिला प्रश्न बाबरी कुणी पाडली? ढाचा कुणी पाडला? स्व.बाळासाहेब ठाकरेंनी जाहिरपणे जबाबदारी स्विकारली पण एकही शिवसैनिक तत्कालीन काळात ढाचा पडताना दिसुन आला नव्हता हा देखील संशोधनाचा विषय म्हणावा लागेल. मात्र स्व.बाळासाहेबांनी स्विकारलेली जबाबदारी त्याची सत्यता कुणी नाकारू शकत नाही. राहिला प्रश्न संजय राऊतांचा? ना कधी ते कारसेवकांच्या भुमिकेत दिसुन आले, ना त्यांनी कधी राम मंदिर प्रश्नावर भुमिका घेतल्याचे पहायला मिळालं. राजकिय चर्चेचं वादळ उडवुन देणं हा त्यांचा मुळ स्थायी स्वभाव त्याचप्रमाणे कोटीच्या दानाचा उच्चार करून त्यांनी आंतरिक भांडाफोड केला असं म्हणायला हरकत नाही. खरं तर ठाकरे शिवसेनेने अर्थात राऊतांनी पुढाकार घेवुन एक कोटी जर राम मंदिर आयोध्या ट्रस्ट यांच्याकडे परत मागितले तर एका क्षणात त्यांनी खरंच दिले असतील तर ते पैसे मिळाल्याशिवाय रहाणार नाहीत. 22 जानेवारीला रामलल्ला स्वतःच्या जागेवर विराजमान होणार आहेत. काय तर म्हणे त्याचे निमंत्रण मिळालं नाही म्हणुन राऊताकरवी ठाकरे शिवसेना ऊर बदडुन घेताना दिसु लागली. केंद्र सरकार यांची काही नियमावली असु शकते. कदाचित त्या नियमात उद्धव ठाकरे बसले नसतील पण राज ठाकरे बसले. शेवटी कुणाला बोलवायचं? आणि कुणाला नाही? हे ज्याच्याकडे कार्यक्रम आहे त्याच मालकाच्या हाती असतं एवढं तरी समजुन घ्यायला हवं. राम कुणाची मक्तेदारी नाही असे म्हणणारे आज केवळ मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीसाठी कुणाच्या मांडीला मांडी लावुन बसले याचे आत्मपरीक्षण त्यांनी करण्याची गरज वाटते. राम मंदिराची लढाई एक-दोन वर्षाची नाही चारशे साडे चारशे वर्षाचा हा लढा त्यात पन्नास-साठ वर्षे ज्या काँग्रेसनं राम मंदिर होवु नये यासाठी आग्रही भुमिका घेतली. केवळ मताच्या राजकारणासाठी ज्यांनी रामचं जन्माला आला नाही व्यवस्थेच्या माध्यमातुन सांगण्याचा प्रयत्न केला. त्या काँग्रेसवाल्यासोबत उबाठा अर्थात उद्धवजी ठाकरे यांनी जाण्याचं कुकर्म केलं त्यांच्यात आयोध्येत जाण्यात मुळात नैतिकता राहिली का? सत्ता पदासाठी जनाबी लाचारी पत्कारून आता आम्ही रामाचे पाईक कसे हा दाखवण्याचा राऊतांचा खटाटोप केविलवाणा दिसतो. केलेले दान पुन्हा पुन्हा काढणे ही मुळात राक्षसी प्रवृत्ती म्हणावी लागेल. उबाठा प्रवक्त्याच्या अंगात जिचा संचार जास्त झालेला दिसतो. एक कोटीचे दान काढणं त्याचा दुसरा अर्थ स्वतःच्या पत्नीला विवाह मांडवात पवित्र मंगळसुत्र घालणं आणि पुन्हा पुन्हा तिला मंगळसुत्र घातल्याचं संसार जीवनात वारंवार सांगणं म्हणजेच उपकाराच्या भाषेत बोलणं असा प्रकार संजय राऊतांच्या भुमिकेतुन सद्या दिसुन येतो. एक कोटी रूपये दिले म्हणजे प्रभु रामचंद्रावर फार उपकार केले याच आविर्भावातुन दानाचं उच्चारण राऊत करताना दिसतात. हे खरं तर हिंदु संस्कृतीतलं फार मोठे दुर्दैवच म्हणावे लागेल. म्हणुनच सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे कर्णपुराण राऊतांनी वाचायला हवं. एक कोटी रूपये प्रभु रामचंद्र मंदिराला दिल्याची भाषा स्व.बाळासाहेब ठाकरेंनी स्वर्गात ऐकल्यानंतर त्यांच्या डोळ्यात देखील आश्रु आले असतील यात शंका नाही. राजकारणात खोटं बोलणं, बनवाबनवी करणं हे कदाचित अशा नेत्याला शोभुन दिसु शकतं. पण पवित्र कर्मासाठी दिलेल्या दानाचं उच्चारण तथा अस्सल मराठी भाषेत सांगायचं झालं तर हागुन काढणं फार मोठं पापकर्म म्हणुन ओळखल्या जातं. यापुढे संजय राऊतांनी प्रवास करताना देखील रस्त्यावर भेटणाऱ्या तृतीयपंथींना दान करता कामा नये. कारण कदाचित केलंच तर ते पुन्हा घरी जावुन म्हणु शकतील की मी आज या नाक्यावर दहा रूपये दिले.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

# विज्ञानवादाच्या आडून नीतीमूल्यांचा ऱ्हास चिंताजनक

आधुनिक केसरी

**नैतिक मर्यादेच उल्लंघन जोपर्यंत होत नाही तोपर्यंत आपली सामाजिक संस्कृती बळकट असते पण एकदा का विज्ञान वादाच्या आडून नैतिक मर्यादा उल्लंघन झाल कि मग आपोआपच निती मूल्यांच पतन आरंभ होऊन संस्कार आणि संस्कृती हि दुबळी होते. व्यक्तिगत व सार्वजनिक नैतिक मर्यादा जोपासली तर आदर्श व्यक्तिमत्व चरित्र निर्माण होण्या बरोबरच सामाजिक पातळीवर पथ दर्शक मार्ग निर्माण होतो. मात्र सध्या विज्ञान वाद आणि चंगळवाद यांच्या आडून नैतिक मर्यादा सैल झाली आहे आणि त्याचा थेट परिणाम सामाजिक संस्कृती वर होत आहे. नैतिक मर्यादा ओलांडून विज्ञान वादाच्या आडून स्वातंत्र्याच्या नावाखाली वाढता स्वैराचार निती मूल्यांचा पतन घडून येण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरतो आहे.**

त्याचा थेट परिणाम स्वरूप पश्चिमात्य देशाच्या संस्कृतीच अनुकरण आपण सध्या ब-यापैकी करू लागलो आहेत.याचा परिणाम थेट कुटुंब संस्था त्याच बरोबर वैवाहिक जीवन यावर होत असून कौटुंबिक विभक्ती करणं तर वाढले आहेच पण त्या सोबत वैवाहिक जीवनात सुद्धा अनेक समस्या अडचणी निर्माण झाल्या आहेत हे वास्तव असून आपण वेळीच सावध झाल पाहिजे.आपण योग्य वेळी सावध झालो नाहीत तर मग मात्र भविष्यात याचे खुप गंभीर परिणाम आपल्याला अनुभवायला मिळतील या मध्ये शंका नाही. निती मूल्यांच वाढत पतन दिवसेंदिवस गतीमान होत चाललं आहे.यासाठी ढोबळमानाने विज्ञान वादाचा प्रभाव हे गोंडस करणं देऊन त्या नावाखाली आपण आपली पाठराखण करून तर घेतोयच पण याला खतपाणी देखिल घालतोय हि शोकांतिका आहे. समाजिक संस्कृतीचा लोप होण्यासाठी विज्ञान वाद नाही तर निती मूल्यांच पतन कारणीभूत आहे. दिवसेंदिवस दिवस निती मूल्य ढासळत चालली आहेत.ढासळणारी निती मूल्य यासाठी आपण स्वतः जबाबदार आहेत मात्र हि जबाबदारी आपण थेट न स्वीकारता विज्ञान वादाच्या नावावर हे सगळं खापर फोडून आपण मोकळे होतो.विज्ञान हे प्रगतीच माध्यम असतं त्याचा वापर करताना निती मूल्य जोपासली तर त्या माध्यमातून विकास तर होतोच आणि सामाजिक संस्कृती देखील बळकट होते. विज्ञाना वादाच्या आडून आपण आपली नैतिक मर्यादा ओलांडून निती मूल्य पायदळी तुडवून मार्गक्रमण केल तर स्वभाविकच खुप मोठ्या प्रमाणात नुकसान होईल.वरकरणी नाव जरी विज्ञान वादाच असलं तरी देखील निती मूल्य यांचं दिवसेंदिवस होत चालेल पतन आणि त्याचा थेट परिणाम व्यक्तिच्या स्वतःच्या जीवना सोबतच सामाजिक संस्कृती दुबळी होण्यासाठी सहयभुत ठरतो आहे.निती मुल्य संपुष्टात आली अथवा दुबळी झाली तर संस्कृती आणि संस्कार यांची लयलूट होते.संसार रथाचे सारथी असणारे स्त्री असो कि पुरूष या उभयतांच्या आचरणातील आत्मकेंद्री भाव स्वार्थाचा वाढता प्रभाव दिवसेंदिवस वाढत असल्या कारणाने ज्या पद्धतीने निती मूल्य ढासळत चालली आहेत त्या अनुषंगाने सामाजिक सांस्कृतिक दुबळी झाली आहे. वास्तविक या मध्ये विज्ञानाचा काही दोष नाही पण आपण विज्ञानाच्या आडून आपली विचारसरणी बदलतो आहेत याचा दोष मात्र विज्ञान युगाच्या माथी मारतो आहेत हे दुर्भाग्य आहे.विज्ञान हे संसारातील प्रगतीच एक महत्वपूर्ण साधनं असून संसारातील भौतिक प्रगती हि विज्ञानाची देणं असते. याच विज्ञानाच्या प्रगतीचा योग्य लाभ घेत असताना आपण आपली नैतिक मर्यादा सांभाळून निती मूल्य जोपासली तर आपसुकच विज्ञान हे तर वरदान ठरेलच पण आपण सामाजिक संस्कृती हि देखील बळकट होईल.विज्ञान हा अध्यात्माचा भाग असून ज्ञान विज्ञान अध्यात्म हे व्यवस्थित पणे जाणून घेतलं तर जीवनाचा उत्कर्ष होण्या सोबत सुसंकृत सामाजिक संस्कृती सुद्धा विकसीत आणि वृद्धिंगत होते.खरया अर्थाने प्रगतीचा आलेख उंचावायचा असेल तर नैतिक मर्यादा पालन होऊन निती मूल्य जोपासली गेली पाहिजेत त्याच बरोबर आपण आपले स्वातंत्र्य उपभोगत असताना संस्कृती बळकट करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वाळू माफियांचा गिरिजा नदीपात्रामध्ये धुमाकूळ सुरूच

## महसूल विभागाचे नेमलेले पथक वाळूमाफियांच्या दावणीला

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार परिसरामध्ये मध्ये वाळू माफ ब धुमाकूळ वडोद बाजार भालगाव वडोद खुर्दवाडी शेवता लिमखेडा या परिसरामध्ये गिरजा नदीपात्रा रोज रात्रीच्या वेळी वाळू माफिया हजारो ब्रश वाळू उपसा गिरजा नदीपात्रातून वाळू माफिया वाळूची ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाळूची हजारो ब्रास वाळू उपसा चोरी करत आहे गिरजा नदीपात्रामध्ये एक ते दीड-खोलीचे खड्डे पडले आहे खोल खड्डे पडलेले मुळे शेतकऱ्याच्या विहिरीचे पाण्याची पातळी खोल केली असल्यामुळे शेतकरी अहवाल दिल झाला आहे त्यामधून वाळू माफियाना हजारो ब्रास वाळूची चोरलेला दिसून येत आहे दुसरीकडे वाळू माफिया यांचे अच्छे दिन आलेले दिसत आहे. त्यामुळे महसूल व पोलीस प्रशासन यांचे दुर्लक्ष दिसून येत आहे दिवसा नदीपात्रामध्ये शेतकऱ्याच्या विहिरीची पाण्याची पातळी खोल गेली असून त्यामुळे भविष्यामध्ये शेतकऱ्याला पिण्याचे पाण्याची भूषण टंचाई निर्माण होण्याची शक्यता दिसून येत आहे गिरजा नदी पात्रामध्ये अवैध रीतीने ट्रॅक्टरच्या सहाय्याने वाळू उपसा कधी थांबणार असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे तर दुसरीकडे वाळू माफिया रात्रीच्या वेळी धुमाकूळ सुरू आहे यावर वरिष्ठ अधिकारी यांनी दखल घेऊन अवैध रीतीने वाळू चालणाऱ्या ट्रॅक्टरवरून मालकावर कारवाई करण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्याकडून होत आहे. महसूल विभागाचे नेमलेले पथक वाळूमाफ्याच्या दावणीला असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमध्ये पडला आहे.






# विद्यार्थ्यांकरिता जिल्हा परिषद प्रशालेतर्फे करिअर मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** येथे 9वी व 10 वी च्या विद्यार्थ्यांकरिता जिल्हा परिषद प्रशाला बाजारसावंगी तर्फे करिअर मार्गदर्शन व मोटिवेशनल सेमिनार आयोजित करण्यात आले होते. ई. टी. अँड सी. इंजिनियर चंद्रकांत उन्हाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनी करिअरसाठी आपल्या मनानुसार, आपल्या आवडी नुसार कुठलेही क्षेत्र निवडावे माञ त्यात मनापासून मेहनत घ्यावी तरच आपल्याला यश मिळेल असे चंद्रकांत उन्हाळे म्हणाले.या सेमिनार मध्ये विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले. ज्यात दहावी नंतर पुढे काय, करिअर कसे निवडावे, मुलांच्या भविष्य घडविण्यासाठी पालकांची काय भूमिका असावी, कोणती फिल्ड निवडावी, कोण-कोणत्या परीक्षा द्याव्या लागतात, डॉक्टर व इंजिनीअर बनण्यासाठी काय करावे, पुढील शिक्षणाचा खर्च किती येतो. अभ्यास कसा करावा एन.डी.ए बद्दल माहिती फॅशन डिझायनर वेटेरिनरी डॉक्टर तसेच ऑनलाईन का ऑफलाईन आदी अश्या अनेक प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना मिळाली. या सेमिनारचं आयोजन जिल्हा परिषद प्रशालेतर्फे करण्यात आले होते. यावेळी मुख्यध्यापक दहिफळे, शिक्षक परदेशी, गौंड, जैस्वाल, शिक्षिका निफाडे, तथा पालकवर्गही मोठया संख्येने उपस्थित होते.

# 'संत सावता दर्शन' व 'महात्मा फुले काव्यदर्पण'चे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** संत सावता माळी युवक संघ जुन्नर तालुका व यशोदीप पब्लिकेशन्स पुणे द्वारा प्रकाशित ह.भ.प. विशाल महाराज गडगे, संदीप वाघोले, प्रा. विजय लोंढे यांनी संपादन केलेल्या संत सावता दर्शन व महात्मा फुले काव्यदर्पण' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन सुदाम महाराज बनकर, माजी मुख्य कार्यकारी अधिकारी सुखदेव बनकर यांच्या हस्ते नुकतेच झाले. काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा नारायणगाव येथील कलासागर मंगल कार्यालय येथे संपन्न झाला.विशाल महाराज गडगे यांनी आपल्या प्रास्ताविकात, 'संत सावता दर्शन , महात्मा फुले काव्यदर्पण' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहांमध्ये महाराष्ट्रातील नामवंत कवी-कवयित्री यांनी संत सावता महाराज व महात्मा फुले यांच्या जीवन, कार्य व विचार शब्दबध्द करण्याचा केलेला प्रयत्न प्रशंसनीय असून वाचकांना दिशा देणारा आहे.असे सांगितले.




संत-समाजसुधारकांच्या विचारांनी समृध्द होण्यासाठी दोन्ही काव्यसंग्रह महत्वाची भूमिका बजावतील असा विश्वास यावेळी माजी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी सुखदेव बनकर यांनी व्यक्त केला.

कृषीरत्न अनिलतात्या मेहेर यांनी, महाराष्ट्रातील नामवंत कवींना प्रातिनिधिक काव्यसंग्रहाच्या पुस्तकरुपाने एका व्यासपीठावर आणण्याचे श्री संत सावता माळी युवक संघाचे काम कौतुकास्पद असून समाजाने समृध्द विचारांचा वारसा जोपासावा असे मत व्यक्त केले. समाजाला मानवतेचा आणि सत्याचा मार्ग दाखवणारे महात्मा फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित ‘सत्यशोधक’ चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत असून सर्वांनी तो चित्रपटगृहात जावून पहावा,असे आवाहन लोकनेते सचिनभाऊ गुलदगड यांनी केले. सदर काव्यसंग्रहाच्या संपादकांनी विशेष परिश्रम घेऊन हे दोन्ही प्रातिनिधिक काव्यसंग्रह प्रकाशित केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.सदर कार्यक्रम प्रसंगी श्री संत सावता माळी युवक संघ संस्थापक अध्यक्ष सचिन गुलदगड, प्रदेशाध्यक्षा अनुराधा गडगे, आंबेगाव गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे, संत सावता माळी युवक संघ जुन्नर तालुकाध्यक्ष संजय लक्ष्मण शिंदे, मनोज शिंदे,अर्चना विधाटे, महात्मा फुले विचारमंच अध्यक्ष सचिन वऱ्हाडी, आत्माराम संते, नंदा मंडलिक, प्रभाकर महाराज फुलसुंदर, संदिप नाईक, राज्य मराठी पत्रकार संघाचे सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे, रामदास वऱ्हाडी, माजी जि.प.सदस्य प्रसन्न डोके, अशोक गडगे, लेण्याद्री देवस्थान अध्यक्ष संजय ढेकणे,ज्येष्ठ अभिनेते सुरेश डोळस, डॉ.पुष्पलता शिंदे,प्रमिला शिंदे,वासुदेव जंबूकर उद्योजक शंकर गडगे,समता परिषद जिल्हाध्यक्ष निलेश भुजबळ,प्रविण शिंदे, जितेंद्र बिडवई, दत्ता म्हस्के, ॲड.भानुदास गडगे, निलेश बनकर, सुखदेव गडगे, संतोष गडगे,नितीन घोडेकर, ग्रा.पं.सदस्य बारकू गडगे, शेतकरी संघटना तालुकाध्यक्ष संजय भुजबळ, विशाल भुजबळ, मंगेश मेहेर आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेमंत कोल्हे यांनी केले तर आभार लक्ष्मण मंडलिक यांनी मानले.

# अजंता एक्स्प्रेस आता भुसावळहून सुटणार

आधुनिक केसरी न्यूज

**मनमाड :** रेल्वे प्रशासनाने काही वर्षात मनमाडकरांच्या हक्काच्या चार रेल्वे गाड्या नाशिक जिल्ह्यातून पळवल्या आहेत. आता ३० वर्षापासून मनमाड येथून सुटणारी मनमाड-सिकंदराबाद अजंता एक्स्प्रेस ही गाडी मनमाडऐवजी भुसावळ येथून सोडण्यात येणार असल्याची माहिती रेल्वेचे महाव्यवस्थापक आर. के. यादव यांनी दिली आहे. जिल्ह्यातील प्रवाशांना तिरुपतीसह दक्षिण भारतात जाण्यासाठी हक्काची गाडी इतरत्र नेली जात असताना लोकप्रतिनिधींनी मौन बाळगले आहे. यामुळे मनमाडसह जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मनमाड-सिकंदराबाद अजंता एक्स्प्रेस ही गाडी मनमाड येथून सायंकाळी नियमितपणे सुटते. दक्षिण भारतात जाण्यासाठी नाशिक जिल्हा नव्हे तर, उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांसाठी ही गाडी अत्यंत सोयीची आहे. महाराष्ट्र आणि दक्षिण भारताला जोडणारा हा दुवा आहे. मनमाड येथून या गाडीला प्रवाशांची दररोज तुंबळ गर्दी असते. भुसावळ, जळगाव येथून सिकंदराबादला जाणार्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांना आठवड्यातून फक्त तीनच दिवस थेट रेल्वे गाडी आहे. या गाड्यांना चाळीसगाव, पाचोरा स्थानकावर थांबा नाही. या प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी मनमाड येथून सिकंदराबादला सुटणारी अजंता एक्स्प्रेस आता भुसावळ येथून सोडण्याचा निर्णय विचारात घेऊन याबाबत रेल्वे मंडळाला प्रस्ताव पाठवण्यात येणार असल्याची माहिती आहे.

सिकंदराबाद अजंता एक्स्प्रेस रोज सायंकाळी सात वाजता मनमाडहून निघते. दुसर्या दिवशी सकाळी सात वाजता पुन्हा मनमाडला येते. १२ तास ही गाडी मनमाड रेल्वे यार्डमध्ये थांबून असते. त्यामुळे या गाडीला भुसावळपर्यंत आणण्यासाठी वेळेची कोणतीही अडचण नाही. शिवाय भुसावळला गाडीची देखभाल करता येईल, यासाठी रेल्वे मंडळाकडे तसा प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे. मराठवाडा, दक्षिण भारत आणि श्री क्षेत्र तिरुपती येथे जाण्यासाठी या गाडीला मनमाड येथून प्रवाशांची नेहमीच गर्दी असते. पण आता ही गाडी देखील भुसावळला पळवून नेण्याचे रेल्वे प्रशासनाचे धोरण असल्याचे स्पष्ट होत आहे. तिरूपती येथे जाण्यासाठी वर्षभर नाशिक जिल्ह्यातून अजंता एक्स्प्रेसने जिल्ह्यातील प्रवासी जात असतात. एक्स्प्रेस पळवून दुसर्या जिल्ह्यात नेली जात असतांना जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी काय करतात, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# ऑनलाईन वस्तू घरपोच मागवताना... !



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

आधुनिक केसरी

**सध्याचे युग हे ऑनलाईन युग आहे असे म्हटले जाते. कारण आज सर्वकाही ऑनलाईन खरेदी करता येते आणि ऑनलाईन विकताही येते. आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे या फोनमध्ये वस्तूंची ऑनलाईन विक्री करणारे किमान ४-५ ॲप्स तरी नक्कीच आहेत. पाण्याच्या बाटलीपासून सोन्याच्या दागिन्यांपर्यंत सर्वच वस्तू, खाद्यपदार्थ ऑनलाईन पद्धतीने आणि तेही सवलतीच्या दरात घरपोच मागवता येतात. हल्ली तर ताज्या भाज्या आणि ताजी फळेही ऑनलाईन मिळू लागली आहेत, त्यातही तुम्हाला ती सेंद्रिय पद्धतीने पिकवलेली हवी असतील, तर तशी सुविधाही उपलब्ध आहे.**

शहरासारख्या ठिकाणी लोकांकडे पैसे जास्त आणि वेळ कमी असल्याने बाजारात जाऊन वस्तूंची निवड करणे आणि त्यांची खरेदी करण्यासाठी गर्दीतून वाट काढत जाणे, दुकानदाराशी भावतोल करणे वेळकाढूपणाचे वाटू लागले आहे. कधीतरी विरंगुळा म्हणून विंडो शॉपिंग ठीक आहे, मात्र गरजेच्या वस्तू मागवण्यासाठी हल्ली ऑनलाईन संकेतस्थळांनाच प्रथम पसंती मिळू लागली आहे. अर्थात आजही ऑनलाईन शॉपिंग करणारा एक विशिष्ट्य वर्ग असून त्याची संख्या दिवसागणिक कमालीची वाढू लागली आहे. त्यातही ऑनलाईन खरेदी व्यवहारात फसवणूक झाली नसेल तर ऑनलाईन खरेदीवरील विश्वास अधिक दृढ होऊन अधीकाधीक वस्तू ऑनलाईन मागवण्याकडेच अशांचा कल असतो. रोजच्या घरच्या जेवणाचा कंटाळा आला असेल, तर हॉटेलमधील लज्जतदार जेवण घरी ताटापर्यंत आणून देणारी स्विगी-झोमॅटो सारखी संकेतस्थळे दिवसातील २४ तासांपैकी झोपेचे ७-८ तास वगळता उरलेला वेळ आपल्या सेवेसाठी तत्पर असतात. किराणा माल, इलेक्टॉनिक वस्तू, घरातील भांडी-कुंडी, फर्निचर, औषधे, पुस्तके, शोभेच्या वस्तू, भेटवस्तू, सर्व प्रकारचे कपडे, बेडशीट, सौंदर्य प्रसाधने, पूजेचे साहित्य सर्व काही ऑनलाईन उपलब्ध करून देणारी असंख्य संकेतस्थळे आज कार्यरत असून त्यामध्ये नवनवीन संकेतस्थळांची भरच पडत आहे. सणांच्या निमित्ताने केली जाणारी खरेदीही हल्ली ऑनलाईन पद्धतीनेच होऊ लागली आहे. वाढती ग्राहक संख्या लक्षात घेता या संकेतस्थळांमध्ये आपसांत कमालीची स्पर्धा सुरु असते. त्यासाठी प्रत्येक संकेतस्थळांकडून विविध ऑफर्स आणि सवलती दिल्या जातात. १५ मिनिटे ते २४ तासांत डिलिव्हरी देण्याचे आश्वासन दिले जाते. पूर्वी केवळ सणांच्या निमित्ताने दिल्या जाणाऱ्या विशेष सवलती महिन्यातील मोजके दिवस सोडल्यास




वर्षभर चालूच असतात. 'विंटर सेल', 'समर सेल', 'हाऊसफुल सेल', 'धमाका ऑफर' यांसारख्या वेगवेगळ्या गोंडस नावांनी ग्राहकांना आकर्षित करण्याची स्पर्धा या संकेतस्थळांवर बाराही महिने सुरु असली, तरी त्यामधून लाभ हा ग्राहकाचाच होतो ही एक जमेची बाजू आहे. या ऑनलाईन कंपन्या थेट उत्पादक कंपन्यांकडून उत्पादने घेत असल्याने त्यांना ती अत्यंत अल्प दरात मिळतात त्यामुळे ग्राहकांना ती आपला लाभ वजा करून स्वस्त दरात देणे त्यांनाही परवडते. या सर्वांचा परिणाम परंपरागत व्यवसाय करणाऱ्यांवर होऊ लागला आहे, हे जरी सत्य असले तरी ऑनलाईन खरेदीत लोकांचे ४ पैसे वाचत असल्याने त्यांचा अधिक कल त्याकडेच असतो. ऑनलाईन वस्तू पुरवणाऱ्या संकेतस्थळांची आणि त्यावर खरेदी करणाऱ्यांची संख्या कमालीची वाढल्याने खरेदी केलेल्या वस्तूंची घरपोच डिलिव्हरी करणाऱ्या कंपन्यांना सुगीचे दिवस आले आहेत. या कंपन्यांना कामगारांची सतत निकड असल्याने याठिकाणी सातत्याने भरती सुरु असते. स्वतःची दुचाकी असेल आणि थोडेफार इंग्रजी वाचता येत असेल, तर या डिलिव्हरी कंपन्या तुम्हाला हमखास नोकरीला ठेवतात. यानिमित्ताने तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाला आहे. कोरोना काळात अनेक खासगी कंपन्या बंद पडल्याने तरुणांवर बेरोजगारीचे मोठे संकट ओढवले होते. त्याच काळात ऑनलाईन खरेदी करून घरपोच वस्तू पुरवणाऱ्या संकेतस्थळांना 'अच्छे दिन' आले असल्याने याठिकाणी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाला. या प्रतिकूल काळात ज्यांच्या नोकऱ्या गेल्या अशा आयटी ईंजिनिअर्सनीही डिलिव्हरी बॉय म्हणून नोकऱ्या केल्या आहेत. डिलिव्हरी बॉय म्हणून नोकरी कारण्याठी विशेष शैक्षणिक अर्हता गरजेची नसल्याने भरती होणारे कर्मचारी कोणत्या प्रवृत्तीचे आहेत आणि कुठल्या ठिकाणाहून आले आहेत याची विशेष खबरदारी या डिलिव्हरी कंपन्यांकडून घेतली जात नसल्याचे काही ठिकाणी लक्षात आले आहे. डिलिव्हरी करणाऱ्या डिलिव्हरी बॉयकडे आपला पत्ता आणि मोबाईल क्रमांक असल्याने या पत्याचा आणि मोबाईल क्रमांकाचा गैरवापर केला गेल्याच्या अनेक घटना मध्यंतरी उघडकीस आल्या. आर्थिक फसवणुकीचे आणि ब्लॅकमेलींगचे अनेक प्रकार घडले. ऑनलाईन ग्रोसरी आणि साहित्य पुरवणाऱ्या एका कंपनीच्या शहजाद शेख नामक डिलिव्हरी बॉयने मुंबईतील खार येथील एका ग्राहक युवतीचा विनयभंग केल्याची घटना गतवर्षी घडली होती. याच वर्षी ऑक्टोबर महिन्यात नोएडा येथे ऑनलाईन मागवलेले किराणा सामान घेऊन गेलेल्या डिलिव्हरी बॉयने घरात तरुणी एकटी असल्याचे पाहून तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. गेल्या वर्षी मार्च महिन्यात ठाण्यात एका डिलिव्हरी बॉयने पाणी पिण्याच्या निमित्ताने घरात प्रवेश मिळवला आणि घरातल्यांना चाकूचा धाक दाखवून १० लाखांचा ऐवज लंपास केला होता, याच वर्षी सप्टेंबर महिन्यात पुण्यामध्ये डिलिव्हरी बॉयने ग्राहक तरुणीकडे चक्क शरीरसुखाची मागणी केली होती. नाशिकमध्ये एका गृहस्थांनी मागवलेले ४ लाख किमतीचे आयफोन डिलिव्हरी बॉयने परस्पर लंपास केल्याची घटना याच वर्षी जून महिन्यात घडली( असे अनुभव अनेकांना आले आहेत. )याशिवाय पाणी पिण्याच्या, मोबाईल चार्ज करण्याच्या बहाण्याने घरात घुसून घरातील मौल्यवान साहित्य पळवणे, दाराबाहेरील शोभेच्या वस्तू, शूज पळवणे, ग्राहकांशी हुज्जत घालणे, ग्राहकांना मारहाण करणे यांसारखे अनेक प्रताप डिलिव्हरी बॉईजने केलेले आहेत. अर्थात या सर्व नकारात्मक घटना असल्या, तरी उन्हातान्हात, थंडी पावसात ग्राहकांचे पत्ते शोधत ग्राहकांना घरपोच वस्तू पोहोचवण्याचे कष्टाचे कामही हेच डिलिव्हरी बॉईज करत असतात. त्यांच्या मेहनतीच्या आणि प्रामाणिकपणाच्याही अनेक कथा आहेत. ऑनलाईन वस्तू मागवणाऱ्या ग्राहकांसाठी डिलिव्हरी घेऊन येणारा इसम हा अनोळखी असतो त्यामुळे प्रत्येक ग्राहकाने सतर्क राहणे अत्यंत आवश्यक आहे. ऑनलाईन मागवलेली वस्तू घरपोच मिळत असल्याने अनेकदा ती घेण्यासाठी इमारतीचे दोन मजले उतरण्याची किंवा घराबाहेर रस्त्यावर येण्याची तसदीही आपण घेत नाही. वस्तू दारात मिळण्याचा आपला अट्टाहास असतो. एरव्ही मोबाईलवर आलेला अनोळखी क्रमांक पाहून फोन न स्वीकारणारे आपण अनोळखी डिलिव्हरी बॉयला थेट घरापर्यंत बोलावतो. सर्वच डिलिव्हरी बॉय प्रामाणिक असतात असे नव्हे. ज्या वस्तू आपण सहज घरी घेऊन जाऊ शकतो त्या वस्तू थेट दारापर्यन्त मागवण्याची आवश्यकता आहे का ? इमारतीच्या खाली किंवा जवळच्या रस्त्यावर जाऊन त्या घेण्याचा त्रास आपण का घेत नाही ? वस्तू घरपोच मागवताना आपण सोबत स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची असुरक्षितताही घेऊन येत आहोत याचेही भान असायला हवे.

# निरागस भावनांचा घेतलेला शोध : मोबाईल माझा गुरु

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक नागेश शेवाळकर यांचे मराठी साहित्यात विपुल लेखन आहे. बाल साहित्य, कथासंग्रह, कवितासंग्रह, समीक्षा ग्रंथ आणि कादंबरी असे त्यांचे चौफेर लेखन आहे. महाराष्ट्रातील विविध नामवंत संस्थांचे त्यांना अनेक पुरस्कार देखील प्राप्त आहेत. त्यांचा नुकताच मोबाईल माझा गुरु हा बालकथा संग्रह बालचमुंच्या भेटीला आला आहे. या कथासंग्रहात एकूण 11 कथांचा समावेश आहे. आजकाल तंत्रज्ञान खूपच प्रगत आहे. त्यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे मोबाईल! अन्न वस्त्र निवारा या मानवाच्या तीन मूलभूत गरजा आहेत आणि आता यात मोबाईलची ही भर पडली आहे.**

मोबाईल शिवाय जीवन हे अशक्यच आहे. पण या मोबाईलचे चांगले आणि वाईट परिणाम समाजात सर्रास दिसत आहेत. हाच धागा पकडून तंत्रज्ञानाने माणसाच्या जीवनात झालेला बदल लेखकांने यात अचूक टिपला आहे. जर तंत्रज्ञानाचा चांगल्या प्रकारे वापर केला तर जीवन सुखकर होते आणि याचा दुरुपयोग केला तर त्याचे दुष्परिणामही आपल्याला पाहायला मिळतात. मोबाईल आयुष्याचा अविभाज्य घटक बनला असताना त्यातून समाजात आता कशाप्रकारे बदल झाले आहेत ते लेखकाने यात अतिशय खुबीने मांडले आहे.




समजूतदार आसावरी या कथेत इयत्ता चौथीच्या वर्गातील हुशार समजूतदार आणि चुनचुनित मुलीची कहाणी आहे. आत्या आणि आई या दोघींमध्ये झालेल्या दुराव्या बद्दल माहित होताच मोबाईलच्या माध्यमातून आपल्या आत्याशी संवाद साधत अतिशय चपखलपणे या निरागस मुलींनी दोघींनाही मोबाईलच्या माध्यमातून एकत्र आणले. कधीकधी लहान मुले ही मोठ्या माणसासारखे बोलतात. आणि मोठी माणसे लहान मुलासारखे करतात, असे बरेचदा आपल्याला समाजात पहायला मिळते. परंतु मोठ्या माणसांची रुसवे फुगवे समजून घेऊन लहान मुलीने ज्या प्रकारे दोघींना एकत्र आणले, ते लेखकाने अतिशय सुंदररित्या वर्णिले आहे.

हट्टी रितेश या कथेत मोबाईल बघत बघत जेवणाऱ्या छोट्या मुलाची कहाणी लेखकाने यात वर्णिली आहे. मोबाईल शिवाय न जेवणारा रितेश आपल्या हट्टीपणामुळे घरात कुणाचेही ऐकत नसे. मोबाईल शिवाय तो जेवणही करत नसे. मग त्याच्या आजोबांनी मोठ्या युक्तीने त्याच्यापासून मोबाईल कसा दूर केला याचे वर्णन अत्यंत सुंदररीत्या लेखकाने या कथेत केले आहे.

मोबाईल माझा गुरु ही कथा आजी आणि नातीच्या गोड नात्याची आहे. लहान मुले किती निरागस असतात हे या कथेत अतिशय सुंदररित्या सांगितले आहे. दुसरीच्या वर्गात शिकणाऱ्या प्रयत्नाची ही कहाणी आहे. मोबाईल आपल्याला ज्ञान देतो, माहिती देतो, आपल्याला माहित नसणाऱ्या साऱ्या गोष्टी सांगतो म्हणून तो आपला गुरु आहे असे ही छोटी निरागस मुलगी मानते. मग आजी जशी गुरूंच्या चरणाची पूजा करते, देवाची पूजा करते, तशी तिची नात मी देखील पूजा करणार असा हट्ट करते आणि दुसऱ्या दिवशी अक्षरशः मोबाईलची पूजा करते. तेव्हा घडलेली गंमत या कथेत लेखकाने वर्णन केली आहे.

यातील सर्वच कथा वाचनीय असून मुलांना आवडणाऱ्या मोबाईलशी निगडित आहेत. प्रत्येक कथेत नाविन्य आढळते. त्यामुळे या कथा वाचताना कुठेही निरसता वाटत नाही. मुले आणि मोबाईल यांच्या नात्याची जवळीक या कथांमधून मांडली आहे. तसेच प्रत्येक कथेत बोधप्रत संदेश लेखकाने दिला असल्याने या कथा मुलांना संस्कार मूल्य आणि भावी नागरिक घडण्यासाठी निश्चितच प्रेरणादायी आहेत.

मासिक ऋग्वेद चिल्ड्रन रिलीफ फंड आजरा यांनी या पुस्तकाची साजेशी बांधणी केली आहे. पुस्तकाची गुणवत्ता आणि पानांचा दर्जा त्यांनी केलेल्या मेहनतीची साक्ष देतो. प्रसिद्ध चित्रकार माननीय श्री. ओमकार महामुनी, यांनी विषयाला अनुरूप काढलेले आकर्षक मुखपृष्ठ व आतील विषयाला अनुरूप सुंदर चित्रे पुस्तकाच्या उंचीत मोलाची भर टाकते. मा. श्री. नागेश शेवाळकर यांना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी मनापासून हार्दिक शुभेच्छा..!

नागेश शेवाळकर

# दादांनो पाणी जरा जपून वापरा....



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**सध्या महाराष्ट्रातील काही भागांवर भीषण दुष्काळाचे सावट पसरल्यामुळे लोकांना पिण्याच्या पाण्याची भीषण समस्या व टंचाई निर्माण झाली आहे.बहुतांश लोकांना तर पिण्याच्या पाण्यासाठी दाही दिशा वनवन भटकावे लागत आहे. तेव्हा कुठे पिण्यासाठी पाणी मिळत आहे. अशी भयानक परिस्थिती यंदा महाराष्ट्रावर ओढवली आहे. कारण यावर्षी महाराष्ट्रातील काही भागांत पाऊसकाळ फारच कमी झाल्यामुळे नद्या, नाले, विहिरी व तलाव कोरडेठाक पडले आहेत आणि जमिनीतील पाणी पातळी खूपच खालावली आहे.**

त्यामूळे लोकांच्या विहीरीचे व बोरचे पाणी आटायला लागले आहे.त्यामुळे गुरे-ढोरे व पशु-पक्षी यांची पाण्यासाठी प्रचंड तारांबळ होत आहे.मानवासह मुक्या जनावरांचे प्रचंड हाल हाल होत आहेत.त्यासाठी राज्य शासनाने ही समस्या वेळीच ओळखून जनावरांसाठी चारा छावण्या व पाण्याची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी. म्हणजे मुक्या जनावरांचा व पशु-पक्षांचा पाण्याचा प्रश्न मिटेल.त्याचबरोबर दुसरा एक महत्वाचा मुद्दा म्हणजे महाराष्ट्रातील बहुतांश गावात दुष्काळजन्य परिस्थिती आतापासूनच निर्माण झाल्यामुळे आणि ऊन्हाळा तर आणखीनच लांब राहिल्यामुळे यंदा महाराष्ट्रातील जनतेला भविष्याची चिंता भेडसावत आहे.कारण काही गावांमध्ये आतापासूनच थेट टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे.ही अतिशय खेदाची व चिंताजनक बाब म्हणावी लागेल. विशेष करून ग्रामीण भागात पाण्याची फार मोठी समस्या निर्माण झाली आहे.लोकांना आतापासूनच पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. उन्हाळा तर लांबच राहिला आहे.तसेच हात पंपाला व बोरला सुध्दा पुरेसे पाणी येत नाही व विहीरी सुध्दा आटत चालल्या आहेत.ही अवस्था आजही माझ्या खंडाळी गावात निर्माण झाली आहे.अशे कितीतरी गावं हल्ली पाणीटंचाईचा सामना करत आहेत.शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन काहीतरी ठोस निर्णय घेतला पाहिजे व लोकांसाठी पाणीसाठा उपलब्ध करून दिला पाहिजे नाहीतर जनतेसाठी बोर किंवा विहिरीचे पाणी अधिग्रहण केले पाहिजे.कारण मानवी जीवनात पाण्याला फार महत्व आहे.खरे तर पाणी हेच जीवन आहे.असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.कारण पाण्याशिवाय आपण एक क्षणही राहू शकत नाहीत.पाणी हे आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक बनले आहे.कारण अंघोळीला पाणी,भांडे घासायला पाणी,कपडे धुवायला पाणी आणि सगळ्यात महत्वाची बाब म्हणजे पिण्यासाठी व स्वयंपाकासाठी पाणी हे आपल्याला दररोज नित्यनेमाने लागतेच.यावरून मानवी जीवनात पाण्याचे महत्व किती आहे ते आपल्याला कळते.म्हणून पाणी बचत ही काळाची गरज आहे हे वेळीच ओळखा आणि त्यासाठी पाणी आडवा व पाणी जिरवा ही मोहीम सर्वत्र राबवा.पाणी जेवढे लागते तेवढेच उपयोगात आना.उगाच पाण्याचा अपव्यय व अतिरेक करणे टाळा.पाणी हे मानवाला निसर्गाने दिलेली अनमोल देणगी आहे तिचा काटकसरीने वापर करा.कारण जल है तो कल है हे नेहमी ध्यानात ठेवा म्हणून म्हणतो दादांनो पाणी जरा जपून वापरा....



# न्यायव्यवस्थेशी न्याय करण्याची गरज



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी कॉलेजियम प्रणालीवरून सरकार आणि सर्वोच्च न्यायालय यांच्यात मतभेद सुरूच आहेत. कॉलेजियमने सुचविलेल्या अनेक नावांना हिरवा कंदील देण्यास सरकार विलंब करत आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय वारंवार नाराजी व्यक्त करत आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने केलेल्या शिफारशींनंतरही उच्च न्यायव्यवस्थेत न्यायाधीशांच्या नियुक्तीला होत असलेल्या विलंबामुळे संतप्त झालेल्या सर्वोच्च न्यायालयाने हे चांगले लक्षण नसल्याचे म्हटले आहे. कोर्ट म्हणाले, 'सरकार आपल्या आवडी-निवडीनुसार न्यायाधीशांच्या नियुक्त्या आणि बदल्याही करत आहे. याबाबत आम्ही सरकारला यापूर्वीही इशारा दिला आहे.**

अलाहाबाद, दिल्ली, पंजाब आणि गुजरात उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या बदलीची शिफारस करणाऱ्या फायली सरकार अजूनही लटकत आहे. गुजरात उच्च न्यायालयात चार न्यायाधीशांच्या बदल्या प्रलंबित आहेत. यावर सरकारने काहीही केले नाही. आज सर्वोच्च  न्यायालयाससहअनेक राज्यात न्यायाधीशांच्या जागा रिक्त आहे.
महाराष्ट्रात विविध न्यायालयात आवश्यक ३२११ न्यायाधीशांच्या जागा रिक्त आहेत. या न्यायाधीशांच्या भरती बाबत राज्य सरकारने पाच जानेवारी बद्दल निर्णय घ्यावा असे दीर्देश मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत.या जागा भरण्यास जाणीव पूर्वक विलंब होत असल्याने म्हणूनच म्हणावे वाटते की
न्यायव्यवस्थेशी न्याय झाला पाहिजे
एक काळ असा होता की न्यायव्यवस्था ही व्यथितांना दिलासा देणारी, नैराश्यग्रस्तांसाठी आशेचा किरण, अन्याय करणाऱ्यांसाठी भीतीचे कारण आणि कायद्याचे पालन करणाऱ्यांना दिलासा देणारी होती. हुशार आणि संवेदनशील लोकांसाठी ते घरासारखे होते; गरीब आणि श्रीमंत दोघांनाही सहज न्याय मिळू शकणारे आश्रयस्थान असायचे आणि न्यायाधीशांच्या खुर्चीवर बसणाऱ्यांसाठी ते सन्मानाचे आणि अभिमानाचे ठिकाण असायचे. पण आजच्या काळात गरिबांना कोर्टात फार कमी प्रवेश मिळतो, दुष्ट लोकांना त्याची पर्वा नाही, धूर्त लोकांनी याला चेष्टा बनवले आहे आणि फक्त कायद्याचे पालन करणारे लोकच घाबरतात. आज परिस्थिती अशी झाली आहे की, धूर्त लोक न्यायालयाचा गैरवापर समाजातील प्रतिष्ठित लोकांवर शस्त्र म्हणून करत आहेत. ते फक्त कोणत्याही व्यक्तीवर खरा किंवा खोटा खटला दाखल करतात आणि केसचा सामना करणारी व्यक्ती स्वतःला निर्दोष सिद्ध करण्यात आपले संपूर्ण आयुष्य घालवते. पूर्वीच्या काळी, दोषी सिद्ध होईपर्यंत तुम्हाला निर्दोष मानले जायचे; पण आज परिस्थिती अशी आहे की जोपर्यंत तुम्ही स्वतःला निर्दोष सिद्ध करत नाही तोपर्यंत तुम्हाला दोषी मानले जाते. निर्दोषत्व सिद्ध करण्याची ही प्रक्रिया कोणत्याही व्यक्तीसाठी खूप लांब आणि महाग झाली आहे. तुम्ही काहीही केले असो वा नसो, तुमच्यावरील आरोपांमुळे तुमची प्रतिष्ठा नष्ट होते. कांची शंकराचार्यांचे उदाहरण घ्या. दिवाळीच्या दिवशी त्यांच्या अटकेची बातमी अतिशय खळबळजनक पद्धतीने मांडण्यात आली. नऊ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर त्याला निर्दोष घोषित करण्यात आले असले तरी त्याच्या निर्दोषतेची कहाणी कोणीही सांगितली नाही. तसेच न्याय व्यवस्थेचा वापर एखाद्या सन्माननीय व्यक्तीची प्रतिष्ठा नष्ट करण्यासाठी शस्त्रासारखा केला जात आहे. प्रसिद्धीच्या हव्यासापोटी कोणत्याही प्रसिद्ध व्यक्तीवर गुन्हा नोंदवून या व्यवस्थेचाही गैरवापर केला जातो. भारताच्या माजी सरन्यायाधीशांच्या मते, सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांचे राज्य सरकार आणि केंद्र सरकारने पालन केले नाही. जेव्हा सरकारेच सर्वोच्च न्यायालयाचा आदर करत नाहीत, तेव्हा सामान्य माणसाला त्याचा आदर करण्यास प्रवृत्त कसे होणार? या सगळ्यावर, संपूर्ण प्रक्रिया पक्षपाती होण्याची भीतीही आहे.
आजकाल परिस्थिती अशी आहे की, खटल्यातील सर्व गुण-दोष असूनही, त्यावरील वादविवाद पूर्णपणे न्यायाधीशाच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असतो. यात सर्वात आश्चर्यकारक बाब म्हणजे न्यायाधीशांची वकिलांशी असलेली जवळीक,



कोणता वकील कोणत्या न्यायमूर्तींच्या जवळ आहे, यावर खुलेपणाने चर्चा होते. या दुर्दैवी परिस्थितीमुळे न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचाराला वाव मिळाला असून, त्यामुळे लोकांचा व्यवस्थेवरील विश्वास कमी झाला आहे. पण यासोबतच भारताने जगातील महान न्यायाधीशही घडवले आहेत, जे सचोटी, बुद्धिमत्ता, स्पष्ट विचार आणि करुणा यांचे प्रतीक आहेत. मात्र, हेही वास्तव आहे की, आज न्यायालयात मोठ्या प्रमाणात खटले प्रलंबित आहेत, त्यामुळे लोक त्रस्त आहेत. अवाजवी विलंबानंतर मिळणारा न्याय हाही अन्याय ठरतो. परिणामी, भल्याभल्यांना कोणत्याही प्रकारे न्यायालयात अडकण्याची भीती वाटते. भरावे लागणारे प्रचंड कायदेशीर शुल्क आणि खूप लांबलचक कायदेशीर प्रक्रियेमुळे, लोक त्यांचे कायदेशीर हक्क सोडून देत असले तरीही इतर मार्गांनी प्रकरणे निकाली काढण्यास प्राधान्य देतात. आज आपली न्याय व्यवस्था आपल्या प्रगतीत मोठ्या प्रमाणात अडथळा आणत आहे आणि प्रामाणिक लोकांचे चारित्र्य डागाळत आहे. भारताच्या माननीय सरन्यायाधीशांच्या मते, याचे एक कारण म्हणजे न्यायाधीशांची कमतरता. ही समस्या सोडवण्यासाठी आणि आपली न्याय व्यवस्था मजबूत करण्यासाठी सरकारने प्रयत्न केले पाहिजेत. यासोबतच न्यायव्यवस्थेला भ्रष्टाचारमुक्त प्रतिमा लोकांच्या मनात निर्माण करण्यात यश आले आहे की नाही, याचेही मूल्यमापन करावे लागेल. समाज सुरळीत चालण्यासाठी, आपली न्यायालये आदराची जागा असली पाहिजेत, जेणेकरून प्रामाणिक लोक त्यांचा आदर करू शकतील, जिथे त्यांना घाबरण्याऐवजी सुरक्षित वाटेल.
आज जेव्हा भारताला आपल्या न्यायव्यवस्थेचा अभिमान आहे आणि प्रसारमाध्यमे अगदी मुक्त आहेत, तेव्हा अशा काही घटना घडतात ज्यात न्यायव्यवस्थेला खटल्यातील तथ्यांपेक्षा लोकांच्या मताची जास्त काळजी वाटते. माध्यमांचा न्याय व्यवस्थेवर अप्रत्यक्ष प्रभाव पडतो. वस्तुस्थितीनुसार जे बरोबर आहे ते ते कसे मांडले जाते यापेक्षा पूर्णपणे वेगळे असू शकते आणि लोकांच्या मताच्या विरोधात कोणीही जाऊ इच्छित नाही. त्याचप्रमाणे, इतर काही तथ्यांचा देखील न्याय व्यवस्थेवर परिणाम होतो, जसे की न्याय व्यवस्थेतील नियुक्त्या, शिफारशी, पदोन्नती इत्यादी सर्व राजकीय दृष्टिकोनातून केले जातात. राजकारण, अर्थव्यवस्था, न्यायव्यवस्था, प्रसारमाध्यमे आणि सामान्य लोक यांच्यातील ही परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची आहे. अशा गुंतागुंतीच्या परिस्थितीत या समस्येवर तोडगा काढणे फार कठीण आहे; कारण यासाठी अनेक पातळ्यांवर सुधारणांची गरज भासणार आहे, पण मुख्य म्हणजे त्यासाठी अत्यंत सजग समाजाची गरज आहे.

# आर्थिक धोरण : नाणेनिधीकडून सल्ला व मार्गदर्शन!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**संपूर्ण जगात इ.स.१९२९ साली मंदीची लाट पसरली होती. त्यानंतर इ.स.१९३१मध्ये इंग्लंडने सुवर्णचलन बंद केले. पुन्हा नंतर यात दुसऱ्या महायुद्धाचीही भर पडली. या तिन्ही घटनांचे विविध देशांची अर्थव्यवस्था, चलनात्मक धोरण व आंतरराष्ट्रीय व्यापार आदींवर विपरीत परिणाम घडून आले. अनेक देशांनी आपापले चलनविषयक वेगवेगळे धोरण सुरू केले. यामुळे संपूर्ण आंतरराष्ट्रीय व्यापार अडचणीत आला होता.**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीः आंतरराष्ट्रीय नाणेनिधी- इंटरनॅशनल मॉनेटरी फंड लघुरूप- आयएमएफ होय. ती सदस्य राष्ट्रांना मुख्यतः विनिमय दरावर आणि देवघेवींच्या ताळेबंदावर प्रभाव टाकणाऱ्या बृहत-अर्थशास्त्रीय धोरणांबाबत पाठपुरावा करावयास लावते. जागतिक वित्तीय व्यवस्थेवर लक्ष ठेवणारी ती आंतरराष्ट्रीय संघटना आहे. आंतरराष्ट्रीय विनिमय दरांमध्ये स्थिरता आणणे आणि कर्जे, पुनर्रचना किंवा मदतीच्या मोबदल्यात इतर राष्ट्रांना आपली आर्थिक धोरणे अधिक उदार बनवावयास लावून विकास घडवून आणण्याचे घोषित ध्येय असणारी ही संस्था आहे. मुख्यतः गरीब राष्ट्रांना ती अल्पकालीन कर्जे देते. तिचे मुख्यालय संयुक्त संस्थानातील वॉशिंग्टन, डिस्ट्रिक्ट ऑफ कोलम्बिया इथे आहे. त्याचे वैशिष्ट्ये असे- * आंतरराष्ट्रीय व्यापारातील देवाण-घेवाणीत समतोल राखणे. * परदेशी व्यापारातील असमतोल दूर करण्यासाठी परदेशी चलन प्राप्त करून देणे. * चलनविषयक आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करणे. * एखाद्या देशाचे देय चलन फेडण्यासाठी अन्य चलन देण्याची सुविधा आस्तित्त्वात आणणे. * परदेशी चलन विनिमय दरात स्थैर्य प्राप्त करणे. अनेक देशांची अर्थव्यवस्था कोलमडून पडली. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन लॉर्ड जे.एम.केन्स याने आंतरराष्ट्रीय सलोखा प्रस्थापित होण्यासाठी एक योजना सादर केली. या योजनेवर विचार करण्यासाठी अमेरिकेतील ब्रेटनवूड येथे जुलै १९४४मध्ये एक परिषद बोलाविण्यात आली. या परिषदेला ४४ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर परिषदेत आंतरराष्ट्रीय नाणेनिधी- इंटरनॅशनल मॉनेटरी फंड- आयएमएफ व आंतरराष्ट्रीय पुनर्निर्माण व विकास बँक-जागतिक बँक स्थापण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना दि.२७ डिसेंबर १९४५ रोजी झाली आणि प्रत्यक्ष कामकाज दि.१ मार्च १९४७ रोजी सुरू झाले. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्ज घेणारा पहिला देश फ्रान्स होता. जे जागतिक बँकेचे सदस्य असतात, ते आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचेही सदस्य असतात. दि.१२ एप्रिल २०१६ला नौरू प्रजासत्ताक या देशाला सदस्यत्व मिळाल्यामुळे त्यातील सदस्यसंख्या १८९ झाली. आयएमएफ निधी कोश हा सभासद देशांनी जमा केलेल्या कोशाने बनलेला असतो. प्रत्येक सभासद देशाने कोशाचा किती वाटा द्यावा, हे संबंधित देशाचे राष्ट्रीय उत्पन्न ५० टक्के, खुली अर्थव्यवस्था ३० टक्के, आर्थिक बदलक्षमता १५ टक्के आणि परकीय चलनसाठा ५ टक्के भार इत्यादी घटक विचारात घेऊन ठरविण्यात येते. सभासद देशांनी त्यांच्या कोट्यापैकी २५ टक्के भाग हा डॉलर व सुवर्णात जमा करावा लागतो. या पद्धतीने संचलित झालेला निधी सामान्य खात्यात जमा ठेवण्यात येतो. दर पाच वर्षांनी सभासद देशाचा कोटा बदलण्यात येतो. या कोट्यावरून सदस्य देशाच्या गव्हर्नरला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मतांचा




अधिकार मिळतो, प्रत्येक सदस्यदेशाला काही स्थिर मते आणि त्या देशाच्या कोट्यापैकी प्रत्येकी १ लाख एसडीआरमागे १ मत याप्रमाणे मतांचा अधिकार असतो, स्थिर मते बदलत असतात. आयएमएफचा आणखी एक निधी कोश म्हणजे स्पेशल ड्रॉईंग राईट्स- एसडीआर होय. हा निधीकोश विशेष खात्यात जमा असतो. या खात्यातील निधी अमेरिका, जपान, फ्रांस, इंग्लंड या देशांच्या चलनाद्वारे संकलित झालेला असतो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कुठल्याही निर्णयासाठी ८५ टक्के बहुमत लागते, त्यामुळे सर्वाधिक कोटा म्हणजेच मताधिकार असलेल्या देशांचा प्रभाव आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या निर्णयावर पडत असतो. साधारणतः दर ५ वर्षांनी सदस्य देशांच्या कोट्यांचा आढावा घेतला जातो.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कारभारावर मुख्य नियंत्रण हे बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे असते. प्रत्येक सभासद देशाचा एक गव्हर्नर व तसेच एक पर्यायी गव्हर्नर या मंडळावर घेण्यात येतो. गव्हर्नरांचे मंडळ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे धोरण ठरविणारी मुख्य चौकट असते. साधारणतः वर्षातून एक वेळा या मंडळाची बैठक होते. या मंडळाद्वारे कार्यकारी संचालक मंडळाची निवड केली जाते. संचालक मंडळ वीस सदस्यांचे असते. त्यापैकी चौदा निर्वाचित व सहा अधिकतम कोटा देणारे सदस्य असतात. रोजचे व्यवस्थापन संचालक मंडळाद्वारे चालते. संचालक मंडळातून एक व्यवस्थापकीय संचालक म्हणून निवडला जातो. सभासद देशांना त्यांच्या कोट्याच्या प्रमाणात मताचा अधिकार दिलेला असतो. एकूण ८५ टक्के मताधिक्याने धोरण बदलण्यात येते. याद्वारे सभासद देशाचा चलन विनिमय दर ठरविला जातो. यासाठी सभासद देशांना त्यांच्या चलनाचे मूल्य डॉलर व सुवर्णाच्या रूपात जाहीर करावे लागते. या पद्धतीमुळे विविध देशांच्या चलनांचा परस्पर विनिमय दर निशिचत करता येतो. परदेशी देवाणघेवाणीत असंतुलनाची समस्या असल्यास दहा टक्क्यापर्यंत हा घोषित दर बदलण्याचा अधिकार असतो. आयएमएफतर्फे सभासदांना विविध प्रकारचा कर्जपुरवठा व स्रोत उपलब्ध करून देण्यात येतात. देशाचा कोटा व निधीकडे त्या देशाचा असणारा चलनसाठा यांच्यातील फरकाएवढी रक्कम सभासदांना कधीही काढता येते. या उचल रकमेवर व्याज आकारण्यात येत नाही. त्यासाठी विशेष अटी लादण्यात येत नाहीत व उचल परत करावी लागत नाही. एखाद्या देशाच्या कोटा रकमेच्या पंचवीस टक्क्यांपर्यंत निधीकडून विनाअटीचे कर्ज मिळते. अन्य प्रकारच्या कर्जासाठी अनेक जाचक अटी असतात. विदेशी देवाणघेवाणीचे संतुलन साधण्यासाठी निधीतर्फे सुचविण्यात येणाऱ्या आर्थिक बदलांची पूर्तता करण्याची लेखी हमी दिल्यासच अन्य प्रकारचे कर्ज मिळू शकते. आंतरराष्ट्रीय पातळीवर प्राथमिक वस्तूंचा साठा करण्यासाठी कोट्याच्या ४५ टक्के, पूर-दुष्काळ इत्यादीमुळे आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीत असंतुलनाची समस्या असणाऱ्या देशांना ७० ते १४० टक्के कर्ज संबंधित अटींसह मिळण्याची सोय आयएमएफ अंतर्गत उपलब्ध असते. त्याचबरोबर आर्थिक तूट, चलन विनिमय दर, आयशात निर्यात कर, आर्थिक धोरण इत्यादीसंबंधी निधीकडून सल्ला व मार्गदर्शन देण्यात येते.

जागतिक बँकः जागतिक बँक- वर्ल्ड बँक ही एक आंतरराष्ट्रीय वित्त आणि पतपुरवठा संस्था आहे. हीची स्थापना दि.२७ डिसेंबर १९४५मध्ये झाली. ब्रेटन वुडस् पद्धती समितीच्या जागतिक आर्थिक नियंत्रण शिफारशीं वापरण्यात आल्या होत्या. या समितीमध्ये ४५ मित्रराष्ट्रे होती. विकसनशील देश व अविकसित देश यांना विकासासाठी कर्जपुरवठा करणारी संस्था असे याचे स्वरूप आहे. या बंकेने पहिले कर्ज फ्रांस या देशाला दिले. जागतिक बँकेची उद्दिष्टे- सरकारांचे सबलीकरण व सरकारी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण, अर्थव्यवस्थांचा विकास, भ्रष्टाचार निर्मूलन, गरीबी हटाव, संशोधन व शिक्षण ही आहेत. शिक्षणासाठी जागतिक बँक विशेष परिश्रम घेते. यासाठी आंतर जालाधारित प्रशिक्षण व इतर पर्यायांचा उपयोग केला जात आहे. भारतासहित अनेक देशांना या बँकेने विवीध प्रकल्पासाठी कर्जे दिली आहेत. पैकी भारतातील गुजरातमधील नर्मदा नदीवरील विवादास्पद धरण सरदार सरोवर प्रकल्पाचे कर्ज त्यातील धोके दिसून आल्याने तिने परत घेतले. इ.स.१९९८ सालातल्या मंदीच्या काळात या जागतिक बँकेने मेक्सिको व इंडोनेशिया या देशांना दिलेला सल्ला आर्थीकदृष्ट्या अतिशय धोक्याचा ठरला आहे.

विरूद्ध बाजूः याच वेळी बँकेचे विरोधक असेही म्हणतात, की बँकेची काही लपवलेली उद्दीष्टेही आहेत. जसे की दुसऱ्या महायुद्धानंतर साम्राज्य लयाला जात चाललेल्या इंग्लंडला नवीन आर्थीक साम्राज्य उभारण्यासाठी या बँकेचा उपयोग करून घेतला आहे. बँकेचे माजी अध्यक्ष व अर्थतज्ज्ञ जोसेफ स्तिगलित्झ यानीही इ.स.१९९९मध्ये तिच्या उद्दिष्टांशी सुसंगत नसलेल्या धोरणांवर टीका केली होती.

# डॉ.पंजाबराव देशमुख : थोर समाजसुधारक



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**भारतात सामाजिक,शैक्षणिक, कृषी आणि राजकीय क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवून आणणारे अनेक महापुरुष महाराष्ट्रात होऊन गेले.या महापुरुषांनी सामान्य व गरीब जनतेच्या हितासाठी अहोरात्र समाजकार्य केले.त्यापैकीच एक महापुरुष होते महाराष्ट्रातील विदर्भ भूमीत जन्माला आलेले थोर रत्न डॉ.पंजाबराव देशमुख.त्यांची आज १२५ वी जयंती आहे. थोर समाज सुधारक डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्ह्यातील पापड या गावी एका शेतकरी कुटुंबात झाला.पापड येथील शाळेत त्यांचे तिसरीपर्यंतचे शिक्षण झाले.**

इयत्ता चौथीचे शिक्षण त्यांनी मामाकडे सोनेगाव येथे राहून चांदूर रेल्वेच्या प्राथमिक शाळेत घेतले. त्यांची माध्यमिकचे शिक्षण कारंजा लाड या गावात झाले.अमरावती येथील हिंदू हायस्कूल मधून ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले.त्यानंतर त्यांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून इंटरमिडिएट पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.१९२० साली ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले.'वेद वाङमयातील धर्माचा उद्‌गम आणि विकास' हा प्रबंध लिहून त्यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठाची पीएचडी मिळवली.नंतर ते बॅरिस्टर झाले. उच्च शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी १९३१ साली अमरावती येथे शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करून,विदर्भात अनेक कॉलेज व शाळा काढून त्यांनी शिक्षण प्रसाराचे काम वेगाने केले.भारतात शेतकऱ्यांचे अनेक पुढारी आहेत पण शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून काम करत असताना १९३१ साली डॉ.पंजाबराव देशमुख यांनी सावकाराच्या कचाट्यातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी कर्जत कायदा पास करून घेतला.सन १९५२ ते १९६२ या दशकात ते भारताचे कृषिमंत्री होते.या काळात त्यांनी शेती व शेतकरी



यांच्यासाठी क्रांतिकारक कार्य केले.सन १९५५ मध्ये त्यांनी भारत कृषक समाजाची स्थापना करून जगातील सर्व शेतकऱ्यांना संघटित होण्याचा प्रामाणिक सल्ला दिला. १९५९ साली त्यांनी दिल्लीमध्ये जागतिक कृषी प्रदर्शन भरवले. त्यामुळे आयसेन हॉवर,खुश्चेव्ह, डॉ.राजेंद्र प्रसाद आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांचे विशेष अभिनंदन केले.मधुमक्षिका पालन कृषी यंत्रसामुग्री संघटना,ताडगुळ महासंस्था,राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघ आणि भारतीय कृषक सहकारी अधिकोष अशा अनेक कृषी संस्थांचे संस्थापक व अध्यक्ष म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख यांनी मोलाचे कार्य केले. त्यांचा जपानी भात शेतीचा प्रयोग उल्लेखनीय आहे.इतकेच नव्हे तर १९४६ मध्ये ते घटना परिषदेचे सदस्य बनले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या या कार्याचा विशेष गौरव केला होता.त्यांनी प्राथमिक शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी भारतीय प्राथमिक शिक्षण संघटनेची स्थापन केली. तसेच शिक्षण प्रसाराचे कार्य करीत असतानाच त्यांनी जुन्या पुराण्या शेती पद्धतीत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले,प्रभावी असे कार्य केले. ते काँग्रेसचे सभासद होते व नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. राजकारणापासून अलिप्त होऊन देवा संस्थानात त्यांनी काही काळ राजकीय मंत्री म्हणून काम केले होते.भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते काँग्रेसमध्ये पुन्हा सक्रिय सहभागी झाले.१९५२, १९५७ व १९६२ या तीनही वर्षाच्या लोकसभेच्या निवडणुकीत ते विजयी झाले.१९५२ ते१९६२ पर्यंत ते केंद्रीय कृषिमंत्री आणि एक वर्ष सहकार मंत्री होते.या काळात त्यांनी अनेक समित्या स्थापन केल्या तसेच कापूस बाजार व शेती परिक्षेत्र अशा क्षेत्रात अमुलाग्र सुधारणा घडवून आणल्या.मागास जमातीसाठी अखिल भारतीय मागास जाती संघ,कृषी उत्पादकांच्या आंतरराष्ट्रीय संघटनांचा संघ,भारत कृषक समाज,आफ्रो-आशियाई ग्रामीण पुनर्रचना संघटना अशा विविध संघटना त्यांनी यशस्वीपणे चालवल्या.जपानी भात शेतीचा प्रयोग देशभर व्हावा म्हणून त्यांनी देशभर मोहीम राबवली व ही मोहीम त्यांनी यशस्वी केली.कृषक समाजाच्या विद्यमाने राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी विक्री संघ आणि कृषक सहकारी भारतीय अधिकोश त्यांनी स्थापन करून शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती केली.

# तर नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल!



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाचे स्वागत दारू पिऊन करण्याकडे तरुण वर्गाचा कल असतो. नववर्षाच्या पूर्वसंध्येला पब किंवा क्लब मध्ये जाऊन पार्टी करणे, दारू पिऊन गाडी चालवणे, हुल्लडबाजी करणे, सायलंसरच्या पुंगळ्या काढून आवाज करणे, मोठ्या आवाजाचे फटाके वाजवणे, डिजेच्या किंवा लाऊड स्पिकरच्या कर्णकर्कश आवाजात भिभत्स नृत्य करणे यासारख्या गोष्टी तरुण वर्गामार्फत केल्या जातात. यावर्षी तर हे प्रमाण खूपच वाढणार आहे कारण शासनानेच पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे.**

पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू राहणार असल्याने तरुणांनी आतापासूनच पार्टीची तयारी सुरू केली आहे. नववर्षाचे अशाप्रकारे स्वागत करणे म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा भंग करणे हे माहीत असूनही अशा गोष्टी केल्या जातात. अलीकडे तर या गोष्टी खूपच वाढल्या आहेत. दारू पिऊन नववर्षाचे स्वागत करण्याची फॅशनच हल्ली रूढ झाली आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला दारू पिलीच पाहिजे असाच समज तरुण वर्गाचा झाला आहे. दारू न पिताही नववर्षाचे स्वागत करता येते यावर त्यांचा विश्वासच नाही त्यामुळेच नववर्षाचे स्वागत दारू पिऊनच केले जाते. दारूचे दुष्परिणाम माहीत असूनही या गोष्टी केल्या जातात. दारू पिऊन भरधाव वेगात गाड्या चालवतात. दारू पिऊन भरधाव वेगात गाडी चालवल्याने बऱ्याचदा अपघात होतात. या अपघातात काही जण मरण पावतात तर काही जण जखमी होतात काही तर काही जण कायमचे जायबंदी होतात. दारू पिऊन गाडी चालवल्याने झालेल्या अपघातात घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंब रस्त्यावर येते. दारू पिऊन गाडी चालवणे म्हणजे स्वतःसह इतरांचाही जीव धोक्यात घालणे म्हणूनच नववर्षाचे स्वागत करताना स्वतःसह इतरांना त्रास होणार नाही याचे भान सर्वांनी ठेवावे. सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना बंधनाची ऐशीतैशी होणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी.

नववर्षाचे स्वागत म्हणजे चांगल्या वाईट गोष्टी दूर सारुण नववर्षाच्या सूर्योदयाच्या साक्षीने नव संकल्पाचा अवलंब करणे, त्याचे निश्चित धोरण ठरवणे, सत्याची कास धरणे आणि नव्या जोमाने, नव्या उत्साहाने कामाला लागणे. यामुळे नव्या वर्षाचे स्वागत करताना पाश्चात्यांचे अंधानुकरण बंद करून प्रत्येकाने चांगले काम करण्याचा संकल्प केला पाहिजे. आज जगाचा पोशिंदा संकटात आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांने पिचलेला बळीराजा आत्महत्या करीत आहेत. देशाचे रक्षणकर्ते जवान दहशतवाद्यांच्या, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद होत आहेत. २०२० ते २०२२ या दोन वर्षात कोरोनाच्या महामारीने अनेकांचा बळी गेला आहे. कोरोनाचे संकट अजूनही कायम आहे.



जे एन १ या कोरोनाच्या नव्या व्हेरीयंटने धुमाकूळ घातला आहे. कोरोनाने आजही लोक मरत आहेत. कोरोनाने घरातील कर्त्या पुरुषाचा बळी घेतल्याने हजारो कुटुंबे रस्त्यावर आली आहेत. कोरोनाने शाळेतील मुले शाळाबाह्य झाली आहेत. दारूच्या नशेत नववर्षाचे स्वागत करण्यापेक्षा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, शहीद जवानांची मुले तसेच कोरोनात पालक गमवलेल्या मुलांना मदत करून आपण नव वर्षाचे स्वागत करू शकतो. कोरोनाने रोजगार हिरावलेल्या कुटुंबाना आर्थिक मदत करून, मुलांचे शैक्षणिक पालकत्व आपण स्वीकारून, गोरगरीब मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून, वृद्धाश्रमाला, अनाथआश्रमाला आर्थिक मदत करून आपण नववर्ष साजरे करू शकतो. रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान. नववर्षाची सुरुवात जर आपण रक्तदान करून केली तर एखाद्या रुग्णाचे प्राण वाचवल्याचे समाधान आपल्याला मिळू शकते. नवीन वर्षात अवयव दानाचा संकल्पही आपण करू शकतो. छोटे छोटे संकल्प आपल्याला भविष्यात मोठा फायदा करून देणारे ठरू शकतात त्यामुळे आपले आणि आपल्या प्रिय जणांचे जीवन अधिक समृध्द आणि अर्थपूर्ण होऊ शकते.

**जुने जाऊ द्या मरणागुनी.....**
**जाळूनी किंवा पुरूनी टाका....**

या कवितेच्या ओळी प्रमाणे मागील वर्षीच्या सर्व चांगल्या वाईट भावना पुसून नव्या वर्षाचे स्वागत करायला हवे. सामाजिक बांधिलकीचे ऋण सेवेतून व्यक्त करण्याचा तसेच अपप्रवृत्तींना आळा घालण्याचा संकल्प केला तर, नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल.

# अपयशी नायक बनला यशस्वी खलनायक

आधुनिक केसरी

**चित्रपटाच्या रुपेरी पडद्यावर चमकणे कोणाला आवडणार नाही ? नायक किंवा नायिका बनून रुपेरी पडद्यावर चमकण्याची बऱ्याच मुला-मुलींची इच्छा असते. यात काही यशस्वी होतात तर काहींवर आयुष्यभर जोडे झिजवीत राहण्याची पाळी ओढवते. काही अशाही व्यक्ती आहेत की ज्यांच्या मनात काही वेगळे करायचे असते पण त्यांचे प्रारब्ध त्यांना चित्रपटाच्या रुपेरी पडद्यापर्यंत आणून सोडते. एक माणूस आपले नशीब चमकावे म्हणून रात्रीचा दिवस करतो तर दुसरीकडे ही संधी एखाद्यापुढे न मागता विनासायास चालून येते याला नशिबाचा खेळ नाही म्हणणार तर काय ?**

हिंदी चित्रपटसृष्टीत असेच एक अभिनेते होते त्यांचे नाव कमल कपूर ! शिक्षण पूर्ण झाल्यावर कमल कपूर यांची नागपुरात पोलिस अधिकारी असलेल्या आपल्या थोरल्या बंधूंकडे जाण्याची इच्छा होती; पण त्यांचे विधिलिखित काही वेगळेच होते. ते नागपूरला जाण्याऐवजी मुंबईतील आपले मावस भाऊ पृथ्वीराज कपूर यांच्याकडे गेले. मुंबईत आल्यावर नशिबाने त्यांना असा हात दिला की ते अन्य कोठे जाण्याऐवजी चित्रपटसृष्टीचेच होऊन गेले.



कमल किशोर कपूर यांचा जन्म २२ फेब्रुवारी, १९२० या दिवशी पेशावर शहरात (आता पाकिस्तानात) झाला. त्यांचे शिक्षण लाहोर शहरात (आता पाकिस्तानात) झाले. शिक्षण पूर्ण झाल्यावर पोलिस अधिकारी असलेल्या त्यांच्या मोठ्या बंधूंकडे जाण्याचा त्यांचा विचार होता. त्या काळातील मध्य भारतातील नागपूर, जबलपूर आणि वर्धा आदी शहरांमधे त्यांच्या बंधूंची नियुक्ती होत असे. पण मनात असते तेच सत्यात उतरते असे थोडेच आहे ? मोठ्या बंधूंकडे जाण्याचा विचार कमल कपूर यांच्या मनात असतानाच अचानक ते मुंबईत दाखल झाले आणि आपले मावस बंधू पृथ्वीराज कपूर यांच्याकडे गेले. त्यावेळी पृथ्वीराज कपूर चित्रपट आणि नाट्य क्षेत्रांमधे चांगलेच नावारूपाला आले होते. हा १९४४ सालातील काळ होता. कर्मधर्मसंयोगाने पृथ्वीराज कपूर यांनी त्याच वर्षी आपल्या `पृथ्वी थिएटर'चा श्रीगणेशा केला होता. कमल कपूर यांचा चित्रपटसृष्टीत जम बसावा म्हणून पृथ्वीराज यांनी त्यांना भरपूर सहाय्य केले. दिग्दर्शक फणी मजुमदार यांनी दिग्दर्शित केलेला `दूर चलें' हा १९४६ साली प्रदर्शित झालेला चित्रपट कमल कपूर यांच्या चित्रपटाच्या कारकिर्दीतील पहिला चित्रपट होता. या चित्रपटामुळे त्यांची थोडी फार ओळख झाली पण हा चित्रपट फारसा चालला नाही. या चित्रपटानंतर कमल कपूर यांनी वनमालासमवेत `हातिमताई', सुरैयासमवेत `डाक बंगला', हुस्नबानूसमवेत `परदेसी मेहमान', रागिणीबरोबर `इन्सान', श्यामाबरोबर `जग्गू' आणि गीता बालीसमवेत `अमीर' आदी चित्रपटांमधे नायकाची भूमिका केली. उण्यापुऱ्या २० चित्रपटांमधे ते नायक म्हणून चमकले; पण `जग्गू' या चित्रपटाचा एकमेव अपवाद वगळता इतर कोणताही चित्रपट फार मोठे यश मिळवू शकला नाही.१९४८ साली आलेल्या राज कपूर यांच्या `आग' या चित्रपटात कमल कपूर यांनी राज कपूर यांच्या वडिलांची भूमिका करताच तशाच प्रकारच्या भूमिका त्यांच्याकडे येऊ लागल्या; पण त्यांनी त्या सगळ्या नाकारल्या. त्या दिवसांत त्यांची कारकीर्द दिशाहीन बनत चालली होती. एका बाजूला चरित्र भूमिका करण्याची त्यांची इच्छा नव्हती तर दुसऱ्या बाजूला नायक म्हणून त्यांचे चित्रपट चालत नव्हते. अशा परिस्थितीत त्यांनी स्वतःच चित्रपट निर्माण करण्याचे ठरवून राजिंदरनाथ जॉली यांच्या साथीत `काश्मीर' हा चित्रपट निर्माण केला. पण हा चित्रपटही आर्थिकदृष्ट्या अयशस्वी ठरला. त्यानंतर त्यांनी स्वतंत्रपणे `खैबर' हा चित्रपट निर्माण केला. पण या चित्रपटात त्यांचे इतके आर्थिक नुकसान झाले की रस्त्यावर येण्याची वेळ त्यांच्यावर ओढविली. त्यांना आपली गाडीही विकणे भाग पडले. नायकाची भूमिका मिळणे तर दूर राहिले; आता लहान-मोठ्या भूमिका मिळणेही दुरापास्त बनले होते. तब्बल ९ वर्षे त्यांना घरी बसून काढावी लागली.१९५८ साल उजाडले आणि त्यावर्षी आलेल्या `आखरी दांव' या चित्रपटात कमल कपूर यांनी प्रथमच खलनायकाची भूमिका साकारली. नायक म्हणून कमल कपूर यांना यश मिळाले नाही तरी १९६० सालाच्या मध्यास हिंदी चित्रपटाच्या प्रेक्षकांचा एका नव्या खलनायकाशी परिचय झाला. हा खलनायक आपल्या स्फटिकासारख्या निळ्या डोळ्यांनी बोलत असे. १९६५ साली प्रदर्शित झालेल्या `जोहर मेहमूद इन गोवा' या चित्रपटाद्वारे कमल कपूर यांची खलनायकी कारकीर्द खऱ्या अर्थाने सुरू झाली. या चित्रपटानंतर त्यांनी `जोहर मेहमूद इन हॉन्गकॉन्ग', `जब जब फूल खिले', `राजा और रंक', `दस्तक', `पाकीजा', `चोर मचाए शोर', `डॉन', `दीवार' आदी अनेक चित्रपटांमधे लहान-मोठ्या भूमिका केल्या. `दीवार'मधे त्यांनी साकारलेली छोटीशी भूमिका प्रेक्षकांना इतकी आवडली की कर्नाटकातील बंगळुरू शहरात वाहतूक नियंत्रण करणाऱ्या एका पोलिसाने त्यांना भेटण्यासाठी त्यांच्या गाडीचा बऱ्याच दूरच्या अंतरापर्यंत पाठलाग केला होता.

१९९३ साली प्रदर्शित झालेला `जखमी रूह' हा कमल कपूर यांचा अखेरचा चित्रपट ठरला. `जखमी रूह' चित्रपटात भूमिका केल्यानंतर ते अभिनयाच्या क्षेत्रापासून दूर गेले. चित्रपट व्यवसायात सुमारे ५० वर्षे वास्तव्य करणाऱ्या या कलावंताचे २०१० साली २ ऑगस्टला मुंबईत निधन झाले.

अनिल तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे






# गेल्या 5 वर्षांत किती योजना पूर्ण झाल्या बीजेपी हिशोब द्या : शिवसेना उ.बा.ठा.

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** गेल्या 5 वर्षांत धुळे महानगरपालिकेत भाजपाची सत्ता आहे. या काळात भाजपा वतीने धुळे शहराच्या विकासा संदर्भात हजारो कोटींचा निधी आणल्याच्या बातम्या, जाहिराती देण्यात आल्या. तसेच आता शेवटचे 2 दिवस शिल्लक असतांना घाई-घाईने विकास कामांचे उद्घाटन आटोपण्याचा घाट सत्ताधारी भाजपाकडून सुरु आहे. असा आरोप शिवसेना उबाठा तर्फे करण्यात आला आहे गेल्या 5 वर्षांत विविध विकास कामांवर आणलेल्या कोट्यावधी रुपयांपैकी किती विकास कामे भाजपाने पूर्ण केली, किती योजना पूर्ण केल्या ? निकृष्ट कामे? महिनाभरात उखडणारे रस्ते? याचा हिशोब धुळेकरांना द्यावा. धुळेकरांच्या मनातील काही प्रश्न शिवसेना उ.बा.ठा. ने महापौर यांना निवेदनाद्वारे उपस्थित केले.

गेल्या 5 वर्षांत कुठल्या योजना शहरात पूर्ण झाल्या नाहीत? त्यामुळे विकासाची वल्गना करणाऱ्या भाजपाच्या माजी शहर जिल्हाध्यक्ष यांनी आपल्या 52 नगरसेवकांसह विद्यमान महापौर व माजी महापौर यांना सोबत घेऊन धुळे शहराचा काय विकास केला, या संदर्भात खुल्या व्यासपीठावर चर्चेला येऊन विकास कामे दाखवावीत, असे खुले आवाहन शिवसेना उ.बा.ठा वतीने करण्यात आले आहे. गेल्या 5 वर्षांत भाजपाने केलेली विकास कामे धुळेकरांसमोर मांडावीत. तसेच भाजपाच्याच माजी स्थायी समिती सदस्य, नगरसेवक यांनी वेळोवेळी विविध प्रश्न महासभेत तसेच स्थायी समितीच्या सभेत उपस्थित करुन भाजपाला घरचा आहेर दिला ते प्रश्न कोणते होते ? ते का सोडविले गेले नाहीत ? भाजपाच्याच नगरसेवकांची प्रश्न मांडतांना गळचेपी का करण्यात आली ? या सर्व प्रश्नांची उत्तरे विद्यमान भाजपा सत्ताधाऱ्यांनी धुळेकरांना द्यावीत असे आवाहन शिवसेना उबाठा वतीने आपणास करण्यात येत आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, किरण जोंधळे, धीरज पाटील, डॉ. सुशील महाजन, प्रफुल्ल पाटील, मच्छिंद्र निकम ,संदीप सूर्यवंशी, संदीप चव्हाण, आण्णा फुलपगारे, प्रवीण साळवे, संजय जवराज, भटू गवळी, सुभाष मराठे, छोटू माळी, महादु गवळी, राजु ढवळे, कैलास मराठे,दिनेश पाटील , शिवाजी शिरसाळे, कपिल लिंगायत, मुन्ना पठाण, संतोष शर्मा,हिमांशू परदेशी, मनोज शिंदे, अजय चौधरी, पिनुभाऊ सुर्यवंशी, सलीम खान, अमोल ठाकूर, वैभव पाटील, नासिर पिंजारी, विष्णू जावडेकर, सागर निकम, नितीन जडे सोनार, गुलाब धोबी, वाल्मिक सोनार, तेजस सपकाळ आदी उपस्थित होते.

# वंदे भारत एक्सप्रेसला रोटेगावला थांबा द्या

आधुनिक केसरी न्यूज

**रोटेगाव :** येथे लवकरच जालना-मुंबई ही वंदे भारत रेल्वे एक्सप्रेस सुरू होत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात रोटेगाव हे रेल्वे स्टेशन वैजापूर साठी आहे.



वैजापूर -रोटेगाव अंतर फक्त दोन ते अडीच किलोमीटर आहे,आता तर वैजापूरचा विस्तार रोटेगाव रेल्वे स्थानक पर्यंत पोहचला आहे. वैजापूर हे जिल्ह्यातील सर्वात मोठे तालुका ठिकाण आहे. अनेक उपविभागीय कार्यालय, जिल्हा सत्र न्यायालय, मोठमोठया बँका, उद्योग व विकसित तालुका साखर कारखाने, रोटेगाव रेल्वे स्टेशन जवळ होऊ घातलेली एम, आय,डी,सी दोन मेडिकल कॉलेज,दोन अग्रीकलचर कॉलेज,इंजिनिअरिंग कॉलेज आहेत ,बी,फार्मसी कॉलेज,नर्सिंग कॉलेज आहेत, दररोज मुंबई,नाशिक, औरंगाबाद, जालना, शी शेकडो प्रवाशांचा,व्यापारी,व्यापारी, उद्योगपती ,विद्यार्थी यांचा संबंध आहे. रोटेगाव हे द.म.रे.चे सर्वाधिक महसूल देणारे रेल्वे स्टेशन आहे असे असताना वंदे भारत या एक्सप्रेस रेल्वेचा थांबा या स्थानकाला देऊ नये हे वैजापूर चे दुर्दैव आहे,आमच्या मराठवाडा विभागातील जालन्याचे केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना,रावसाहेब दानवे यांनी आपले वजन वापरून व मराठवाड्याच्या रेल्वे प्रवाशांचा विचार करून जास्तीत जास्त सोयी -सुविधा मिळवून द्यायला हव्यात, लासुर स्टेशन व रोटेगाव ला त्यानी वंदे भारत या एक्सप्रेस रेल्वे चा रोटेगाव थांबा (वैजापूर)ला मिळवून द्यावा व ईतर रेल्वेचे ही रोटेगावला थांबे द्यावेत अशी अपेक्षा व विनंती आहे.



# आ.फारुख शाह यांच्या हस्ते संत नरहरीनगर येथे रस्ते कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महाराष्ट्र राज्य नगरोत्थान महाअभियान अंतर्गत शहरातील प्रभाग क्र.११ संत नरहरी कॉलनी,माणिक नगर मध्ये रस्ते डांबरीकरण व गटार करणे कामाचा शुभारंभ आ.फारुख शाह यांचे हस्ते करण्यात आला.शमसुल हसन यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या शुभारंभ कार्यक्रमास नगरसेवक गनी डॉलर, नगरसेवक डॉ.सरफराज अन्सारी,माजी नगरसेवक साजिद साई,डॉ. दीपश्री नाईक,निजाम सैय्यद,शकीला शेख, मलिका खाटीक,परवीन शेख,इकबाल शाह,शोएब मुल्ला,रफिक पठाण,आसिफ शाह,नजर खान,सुफी कुरेशी,डॉ. बापुराव पवार, सउद आलम,फैसल अन्सारी,साहिर पटेल,नुर शाह,सुफियान अन्सारी,रमजान पाटील, सइद बाबा,नुसार शेख,गुलाम अन्सारी,आसिफ अन्सारी,इसाक पिंजारी,आरिफ पिंजारी, रइस सय्यद,जावेद पिंजारी, अन्वर पिंजारी,सरोज खाटीक आदी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे जिल्हाध्यक्ष शिरसाट यांच्या हस्ते पूजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथून सिल्लोड तालुक्यातील केऱ्हाळा येथे जात असतानी आज फुलंब्री येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे फुलंब्री येथे नगरपंचायत समोर आगमन झाले असता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे पूजन, डिजे च्या, फटाक्यांच्या आतीषबाजीत भाजपा जिल्हाध्यक्ष सुहासभाऊ शिरसाट यांच्या हस्ते झाले...

या प्रसंगी भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ, भाजपा फुलंब्री तालुका उपाध्यक्ष राम बनसोड, नगरसेवक शेखर पालकर, वाल्मीक जाधव, भगवान निराशे, नगरसेवक बाबासाहेब शिनगारे, रवी बळी, संतोष जाधव, सागर ढेपले, पंडित नागरे, सुदाम पवार, सुदाम बनसोड, सूर्यभान बनसोड, बाळासाहेब शेरकर, आकाश गोरावणे, अजय नागरे, राम हापत, सुनील शेरकर, नंदु राऊत, अर्जुन राऊत, साहेबराव बांबडे, कैलास पांढरे, विक्रम पांढरे, सागर पाटील, पंडित नागरे, उद्धव गिरी गजानन रघु, राजू वाघ, रामचंद्र नागरे, सुभाष नागरे, रवींद्र ढंगारे, अंकुश बनसोड, गजानन गावडे, अनिल पठारे आदिसह शेकडो शिवप्रेमी नागरीक उपस्थित होते.



# मोदींचे स्वप्न पूर्ण करण्यात महाराष्ट्र पुढे राहील

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : बल्लारपूर येथे क्रीडा स्पर्धांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज




67 व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धाच्या अनुषंगाने उद्घाटन सत्रात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चंद्रपूर गॅझेटीयर आणि ग्लोरी ऑफ चंद्रपूर या दोन पुस्तकांचे विमोचन करण्यात आलं. 1909 मध्ये सर्वप्रथम चंद्रपूर गॅझेटीयर प्रकाशित करण्यात आले होते. त्यानंतर त्याच गॅझेटियर ची सुधारित प्रत 1973 मध्ये प्रकाशित करण्यात आली होती. परंतु मराठीमध्ये पहिलं गॅझेटियर हे यावर्षी प्रकाशित करण्यात आलेले आहे. तर ग्लोरी ऑफ चंद्रपूरच्या माध्यमातून चंद्रपूर जिल्ह्याचा ऐतिहासिक वारसा पुरातन मंदिर जंगल वाघ व विविध विषयांचा आढावा यात घेण्यात आलेला आहे.

**चंद्रपूर :** मिशन ओलंपिक 2036 हे मोदींनी पाहिलेल स्वप्न असून हे स्वप्न पूर्ण करण्यात महाराष्ट्र पुढे राहील, याची सुरुवात गुरुवारी चंद्रपूर मधून झाली आहे, असे मत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या उद्घाटनाच्या भाषणात व्यक्त केले. बल्लारपूर तालुक्याच्या ठिकाणी पहिल्यांदाच राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा होत असून या क्रीडा स्पर्धांच आयोजन आणि नियोजन अगदी भव्य स्वरूपात व दिमाखदार पद्धतीने केल्याबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राचे वनमंत्री व चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे कौतुक केले. खेलो इंडिया, फिट इंडिया आणि मिशन ऑलिंपिक हे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न असून त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र शासन खेळाडूंच्या सोयी सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करत आहेत, शिवाय खेळाडूंना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांच्या रकमेत मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली असून या माध्यमातून खेळाडूंना सर्व ठिकाणी योग्यत्या सोयीसुविधा उपलब्ध होतील. संपूर्ण राज्यात खेळाचे वातावरण तयार होईल आणि त्यातून मिशन ऑलिंपिक साठी आवश्यक असणारे खेळाडू या महाराष्ट्राच्या मातीत तयार होतील असा आशावाद मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. 67 व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धांच्या भव्य दिव्य उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते .

यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्राचे वनमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार ,आमदार रामदास आंबटकर ,पद्मश्री व द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त बहादुर सिंग चव्हाण , क्रीडामंत्री संजय बनसोडे, विकास खरगे, ऑलिंपिक सुवर्णपदक विजेती खेळाडू हिमा दास, राष्ट्रीय खेळाडू ललिता बाबर ,मालविका बनसोड, जिल्हाधिकारी विनय गौडा, पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वर्गीय पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून या सोहळ्याला सुरुवात करण्यात आली. सोहळ्याची सुरुवात जय जय महाराष्ट्र माझा या राज्य गीताने आणि दीप व मशाल प्रज्वलनाने करण्यात आली. ऑलम्पिक खेळाडू मंजितसिंग यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मशाल सोपविली व मुख्यमंत्र्यांनी मैदानावरील मशाल प्रज्वलित करत या राष्ट्रीय शालेय क्रीडा मैदानी क्रीडा स्पर्धांची सुरुवात करण्यात आली

यावेळी पुढे बोलताना मुख्यमंत्र्यांनी नरेंद्र मोदी हे देशाची अर्थव्यवस्था वर नेण्याचे काम करत असून विकास म्हणजे काय असतो ते या नऊ वर्षात देशवासीयांनी अनुभवला आहे. शिवाय खेळाडूंच्या जीवनाला एक नवा आयाम देण्याचे काम नरेंद्र मोदी करत आहेत असा आशावाद व्यक्त करत महाराष्ट्र सरकार सुद्धा त्यांच्या अकरासूत्री कार्यक्रमात खेळासाठी भरपूर योजना तयार करीत असून गाव तिथे मैदान या माध्यमातून महाराष्ट्रात खेळाचे वातावरण तयार होईल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मैदानावर खेळला जाणारा प्रत्येक खेळ हा खेळ भावनेतूनच इथे खेळला जावा व देशाचे नाव रोशन करणारे खेळाडू इथून मिळावे अशा आशावाद व्यक्त केला. खिलाडूवृत्ती नसल्यास व्यक्तिमत्त्वाचा विकास पूर्ण होत नाही म्हणून हार किंवा जीत याचा विचार न करता आपल्या देशाचे नाव कसे मोठे होईल असा विचार खेळाडूने करावा व चंद्रपुरात देशातील सगळ्यात मजबूत खेळाडू येथे तयार व्हावेत त्यासाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी आपल्यास योग्य त्या सोयीसुविधा मिळावी यासाठी प्रयत्न करेल असा विश्वास उपस्थित खेळाडूंना दिला.

67 व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धांचे मुख्य संयोजक सुधीर मुनगंटीवार यांनी या स्पर्धेसाठी देशभरातून आलेल्या सर्व खेळाडूंना 2036 च्या ऑलिंपिक पर्यंत पोहोचण्यासाठी बल्लारपूर तालुक्यातील विसापूर स्टेडियम मध्ये होत असलेली ही स्पर्धा ऊर्जा प्रदान करो अशी सदिच्छा व्यक्त केली . ऑलम्पिक मध्ये पोहोचण्याचा संकल्प या स्पर्धेतील प्रत्येक खेळाडूने करावा, चंद्रपूर गडचिरोलीतील कोहिनूर या स्पर्धांतून निघावेत आणि ऑलम्पिक मध्ये महाराष्ट्रातील सगळ्यात जास्त खेळाडू पोहोचतील यादृष्टीने सर्वांनी प्रयत्न करावेत. त्यासाठी इथे आलेल्या प्रत्येक स्पर्धकांनाच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्वच स्पर्धकांना शासनाच्या वतीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल असा विश्वास त्यांनी देशभरातून आलेल्या खेळाडूंना दिला.

सुवर्णपदक विजेती खेळाडू हिमा दास यांनी आसाम मधल्या एका लहानशा खेड्यातून आपण जेव्हा आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचू शकतो तेव्हा इथे आलेला प्रत्येक खेळाडूला सुद्धा ही संधी उपलब्ध आहे. त्यामुळे आपण सगळ्यांनी मिशन ओलंपिक 2036 साठी लक्ष डोळ्यासमोर ठेवून खेळावे व सरकारने सुद्धा खेळाडूंना पाठिंबा द्यावा असे आवाहन केले.

आपल्या प्रास्ताविकातून जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी या स्पर्धांच्या आयोजनामाची पालकमंत्र्यांची भूमिका ,या स्पर्धेसाठी मेहनत घेणाऱ्या सर्व प्रशासकीय अधिकारी , एनजीओ यांचे कौतुक करत इथल्या आयोजन नियोजनामध्ये कुठलीही त्रुटी राहणार नाही यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करीत आहोत असा संदेश देत चंद्रपूर जिल्ह्याचा गौरवशाली इतिहास येथील स्पर्धकांसमोर मांडला.



## लोकसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला सोडावी

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्या असुन यासाठी प्रत्येक गावात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वाढवण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. तसेच युवकांनी गाववाईज कमीटी तयार कराव्यात, विद्यार्थी संघटनेच्या पदधिकारी यांनी गावागावात जाऊन पक्ष वाढवावा असे आवाहन माजी आमदार शिवराम झोले यांनी केले. खंबाळे येथे अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत माजी आमदार शिवराम झोले बोलत होते. जिल्हाध्यक्ष विष्णु म्हैसधुने यांनी या आढावा बैठकीत बोलतांना सांगितले की ज्या नवीन पदाधिका ऱ्यांना नियुक्ती पत्र दिले आहे त्यांनी पक्ष वाढवण्यासाठी जोमाने कामाला लागावे. पुढील खासदार व आमदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचाच निवडुण आले पाहिजे यासाठी प्रत्येकाने मागील नाराजी बाजुला ठेवुन प्रत्येक कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागले पाहिजे, तसेच नाशिक लोकसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडण्यात यावी व मतदारसंघातून जिल्हाध्यक्ष विष्णु म्हैसधुने यांनाच खासदारकीची उमेदवारी द्यावी अशी मागणी प्रदेश सचिव गोरख बोडके यांनी या बैठकीत केली. या बैठकीत प्रदेश सचिव गोरख बोडके, युवक जिल्हाध्यक्ष योगेश निसाळ, बाळासाहेब गाढवे, आदींनी मनोगत व्यक्त केले. या बैठकीला माजी आमदार शिवराम झोले, प्रदेश सचिव गोरख बोडके, जिल्हाध्यक्ष विष्णु म्हैसधुने आदी उपस्थित होते. सुत्र संचालन तालुकाध्यक्ष पांडुरंग वारुंगसे यांनी केले. यावेळी विविध नियुक्तीचे पत्र नवीन पदाधिकारी यांना देण्यात आले.

## पाण्यावर तरंगणाऱ्या बाबाचं रहस्य काय ?

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** हाराष्ट्रात अंधश्रद्धेच खुप मोठ पेव फुटलेले आहे. पाण्यावर तरंगणारे बाबा अनेकांनी पहिले असेलच. त्यांनी केलेला दावाही तुम्ही सगळ्यांनी ऐकला असेल. मात्र, त्यांच्या या दाव्यात कोणतेही तथ्य नसून किंवा यात कोणतेही रॉकेट सायन्स नसून हे सराव आणि योग साधनेमुळे सहज शक्य असल्याचं मत संम्यक संस्थेचे कार्यकारी संचालक आनंद पवार यांनी प्रञकारांच्या कार्यशाळे दरम्यान केले आहे. या तरंगणाऱ्या आनेक बाबांने केलेला दावा यामुळे फोल ठरवला आहे. सांगितले की, पाणी हा पंच महाभूतांमधील महत्वाचा घटक आहे. याच पाण्याला आपण जीवन असंही म्हणतो. पण जेव्हा एखाद्याला पोहता येत नाही, तेव्हा त्याला मृत्यूचा सामना करावा लागतो. तसेच पाण्यात हातपाय हलवणारे आपण अनेकजण पाहतो. तसेच सराव, योग साधनेतून हातपाय न हालवता आपण पाण्यावर कितीही वेळ राहू शकतो हे आनंद पवार यांनी प्रात्यक्षिक करून दाखवून दिले आहे. त्यामुळे बिना हातपाय हलवता तासंतास पाण्यावर तरंगून राहणे शक्य असल्याचे पवार यांनी सांगितले आहे. जलयोग आणि हवेतील योगाने संपूर्ण शरीराला ताण मिळत असल्याचे ते सांगतात. आनेक बाबा करत असलेल्या दाव्यात तथ्य नसल्याचे पवार यांनी सांगितले आहे.पाणी म्हणजे काय हे लोकांनी समजून घेतलं तर ज्या आजारांवर जमिनीवरच्या योगासनांनी फायदे होतात तेच पाण्यात केले तर अधिक फायदे होतील. तसेच दमछाक होऊन जे मृत्यू होतात ते कमी होतील. पाण्याविषयी लोकजागृती करून जास्तीत जास्त लोकांना वाचवणे हाच आपला उद्देश असल्याचे आनंद पवार यांनी सांगितले आहे.

पाण्यावर हातापायांची हालचाल न करता तरंगणाऱ्या पवारांची चर्चा पञारांमध्ये चांगलीच रंगली होती यावर बोलतांना पवार म्हणाले आनेक बुवा बाजी करणारे बाबा सांगतात मी बारा महिने उपवास व साधना केली मला रिद्धी सिद्धी प्राप्त आहे म्हणून मी पाण्यावर तरंगु शकतो, असा दावा करतात परंतु, अध्यात्माचा आणि पाण्यावर तरंगण्याचा काही एक संबंध नाही.हे थोतांड,अंधश्रद्धा आहे ते केवळ सरावाने मिळवलेले कौशल्य आहे,आसे आनंद पवार यांनी सांगितले.



कुणी पाण्यावर तंरगतय तर कोणी तापलेल्या तव्यावर बसतय हे सर्व थोतांड आसुसून अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचा प्रकार आसुन आशा प्रकारे बुवाबाजी करणाऱ्यावर विश्वास ठेऊ नये
**शांताराम मगर, जिल्हाध्यक्ष**
**अंधश्रद्धा निर्मूलन वैज्ञानिक दृष्टिकोन प्रबोधन समिती संभाजीनगर**

## भाकपचा वर्धापन दिन उत्साहात साजरा; कौटुंबिक स्नेहसंमेलनाने सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा 98 वा वर्धापन दिन रॅली, कौटुंबिक स्नेहसंम्मेलनाने उत्साहात साजरा झाला. पैठणगेट ते सिल्लेखाना गांधी भवन पर्यंत मिरवणुक काढुन पक्ष सभासद व सहानुभुतिदारांचे कौटुंबिक स्नेहसंम्मेलननाने उत्हात भारतीय कम्युनिस्ट पक्षाने 98 वा वर्धापन दिन साजरा केला. रॅलीत महापुरुषांचे व संतांचे फोटो कार्यकर्त्यांनी हातात धरले होते. हिंदु मुस्लीम सीख इसाई हम सब भाई, हम लडेथे गोरोसे हम लडेथे चोरोसे, 98 वर्षाच्या भाकपला लाल सलाम इ घोषणांनी परिसर दणाणुन गेला, गांधीभवन सिल्लेखाना येथे मिरवणुक पोहोचल्यावर भाकप च्या शहर कौन्सिल तर्फे आयोजित या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर सचिव कॉ ॲड अभय टाकसाळ यांनी केले. भाकप गोरगरीब कष्टकर्यांचा पक्ष आहे, रस्त्याने जेव्हा लोक कमी संख्येने का असेना जेव्हा लाल झेंडा घेऊन अन्याय ,अत्याचार,भेदभावा विरोधात घोषणा देत निघतात तेव्हा लोकशाही जिवंत असल्याचा प्रत्यय सर्वांना येतो, पक्ष वाढवुया , संविधान वाचवुया असे आवाहन यावेळी त्यांनी केले. पक्षाचे शहर सहसचिव कॉ जॅक्सन फर्णांडीस, कॉ अनिता हिवराळे व कॉ रफीक बक्श त्याच बरोबर दोनदा हज आणि उमरा करुन आलेले जेष्ठ सभासद कॉ सय्यद मकसुद अली उर्फ मन्नाभाई , एस एफ आयचे डॉ लोकेश कांबळे यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ समाधान इंगळे ,अमरजित बाहेती , नभा इंगळे, उमेश इंगळे यांच्यासह रिक्षाचालक समाधान पारधे, पेट्रोल पंप कामगार सुखदेव कांबळे, होल्डींग हॅण्डचे सुरेश सिरसिकर, ॲड अभय टाकसाळ, हर्षवर्धन घनघावे यांनी कराओकेवर गाणी सादर केली. बच्चे कंपनी दिक्षांत जमधडे, अनुश्री पेढे यांनी शाळेच्या स्नेहसंम्मेलनात बसवलेले नृत्य सादर केले. पुढील वर्षी भाकप 100 व्या वर्षात पदार्पन करणार असल्याने मोठ्या प्रमाणात प्रदर्शन, पुस्तक प्रकाशन, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींनी साजरा केला जाईल अशी घोषणा भाकपचे राज्य सहसचिव कॉ राम बाहेती यांनी अध्यक्षीय समारोपात केली. लाल बावटा शेतमजुर युनियनचे जिल्हा सचिव कॉ गणेश कसबे यांनी शूभेच्छा दिल्या. यावेळी मच्छींद्र गोर्डे, इंद्रकुमार जेवरीकर, कॉ विकास गायकवाड , कॉ जफर फजलु रहमान, कॉ. नीता कीर्तीशाही, कॉ. अर्चना घाटे, शीला मुजमुले, कॉ. माधुरी जमधडे, कॉ. राजु हिवराळे, भालचंद्र चौधरी, कॉ संदीप पेढे, कॉ. अभिजित बनसोडे, कॉ आतिष दांडगे, कॉ.गौतम शिरसाठ, कॉ पुष्पा बिरारे, कॉ कविता गायकवाड, कॉ चंदाबाई आराक, गंगुबाई मासुळे, इमरान बागवान, विजय रोजेकर यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व सहनुभुतिदार उपस्थित होते.



# अंगणवाडी सेविका मदतनीस यांच्याकडून आदेशाची होळी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या संपावर कुठल्याही प्रकारचा तोडगा न काढता त्यांचा संप मोडून काढण्यासाठी आयुक्तांकडून काढण्यात आलेल्या शासनाच्या जीआरची लोणार तालुक्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्याकडून होळी करण्यात आली.

महाराष्ट्रातील दोन लाख पंचवीस हजार अंगणवाडी सेविका मदतनीस चार डिसेंबर पासून आपल्या विविध मागण्यासाठी काम बंद करून संपावर गेलेल्या आहेत. शासन देत असलेले तुटपुंचे मानधन वाढवून अंगणवाडी सेविकांना 26 हजार व मदतनीस यांना 20 हजार रुपये वेतनश्रेणी लागू करण्यात येऊन शासकीय दर्जा देण्यात यावा. लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराचा दर 8 रुपया वरून प्रति लाभार्थी 16 रुपये व कुपोषित बालकासाठी 24 रुपये करण्यात यावा सेवानिवृत्त झाल्याच्या नंतर अनेक अंगणवाडी सेविका मदतनीस यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे.दोन वेळेच्या जेवणासाठी त्यांना मुलांकडे किंवा सुनेकडे हात पसरावे लागत आहेत त्यांची अत्यंत वाईट अवस्था आहे यासाठी शासनाने पेन्शन लागू करण्यात यावे. सर्वोच्च न्यायालयाने



एप्रिल महिन्यामध्ये दिलेल्या निकालपत्रामध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युएटी देण्यात यावी. असे असतानाही शासन देण्यास टाळाटाळ करत आहे यासह विविध मागण्यासाठी महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविका व मदतनीस संपावर गेलेल्या आहेत या संपावर तोडगा काढण्याचे सोडून शासन वेगवेगळ्या मार्गाने त्यांचा संप मोडून काढण्याचा प्रयत्न करत आहे त्याचाच भाग म्हणून एकात्मिक बाल विकास सेवा योजना महाराष्ट्र राज्याचे आयुक्त रुबल अग्रवाल यांनी जीआर काढलेला आहे. त्यामध्ये अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या ताब्यातील अंगणवाड्या ताब्यात घेण्यात याव्या.अंगणवाडीतील लाभार्थींना, स्तनदा माता, गरोदर स्त्रिया यांना देण्यात येणाऱ्या आहार शाळेतील आहार शिजवणाऱ्या महिला कडून शिजवुन घेण्यात यावा लाभार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून पर्यायी व्यवस्था करण्यात यावी. यासह अनेक प्रकारचे आदेश एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयाला देण्यात येऊन अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा संप कुठल्याही प्रकारच्या मागण्या मान्य न करता मोडून काढण्याचा प्रयत्न करत आहे म्हणून लोणार तालुक्यातील अंगणवाडी सेविका मदतनीस यांनी तालुक्यातील एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयाच्या समोर उपस्थित राहून या जीआरची आदेशाची होळी करण्यात आली.

यावेळी लोणार तालुका संघटनेच्या अध्यक्ष नंदिनी चव्हाण, उपाध्यक्ष शोभा भोकरे, पुष्पा मोरे, शारदा घायाळ यांच्यासह तालुक्यातील सर्व अंगणवाडी कर्मचारी उपस्थित होते.

## जाणीव हेल्पिंग फाउंडेशनकडून तृतीयपंथीयांचा सन्मान

### फेम इंडिया फॅशन वॉक रनवे कार्यक्रम संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** जाणीव हेल्पिंग फाउंडेशन प्रस्तुत इंडिया फेम फॅशन वॉक रनवे चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक युवक,युवतींसह तृतीय पंथीयांना देखील या स्पर्धेत सहभागी करून घेण्यात आले होते. तृतीयपंथीयांच्या सहभागाने कार्यक्रमात एक वेगळेपण पाहायला मिळाले.

एकप्रकारे जाणीव हेल्पिंग फाउंडेशनकडून तृतीयपंथीचा सन्मानच करण्यात आल्याने या आयोजना बद्दल विशेष कौतुक करण्यात आले. हे आयोजन करण्यासाठी साईप्रसाद सरकाळे यांच्या कडून विशेष मेहनत घेण्यात आली होती.मिस्टर एशिया, मिस्टर महाराष्ट्र २०२९ म्हणून साईप्रसाद सरकाळे यांची ओळख असून आपल्यासारखीच इतरांना सुद्धा संधी मिळावी या हेतूने कंट्री क्लब, पुणे येथे हा कार्यक्रम दिमाखात संपन्न करण्यात आला.या स्पर्धेत एक विशेष पाहायला मिळाले.या स्पर्धेतून तृतीयपंथीयांना संधी देण्यात आल्याने एक चांगला संदेश समाजा पर्यंत गेला सामाजिक एकता, समानता व वंचितांना प्रवाहात आणणे हा प्रमुख हेतू सदर कार्यक्रमातुन पाहायला मिळाला. सदर शोमध्ये कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण महामंडलेश्वर महाराष्ट्र किन्नर आखाडा सौ शिवलक्ष्मी सलाटे आईसाहेब ह्या होत्या. साईप्रसाद सरकाळे यांचे निस्वार्थी काम पाहून आईसाहेबानी त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा व पाठींबा दिला.शो डायरेक्टर म्हणून आशिष रूपानी यांनी कामकाज पार पाडले.शो मध्ये एकूण ५० च्या वर स्पर्धक सहभागी झाले होते.स्नेहल ,मनीषा, दुर्गा ,सनी ,गौरव , श्रीज्या व साईराज हे स्पर्धक शो स्टॉपर म्हणून सहभागी झाले होते. साज्ञी शांडलिया (किड्स कॅटेगरी ),चेतन मोरे (मिस्टर कॅटेगरी), आरती साळुंखे (मिस कॅटेगरी),सोनाली चव्हाण (मिसेस कॅटेगरी), दिनेश धमाने व रिता पुणेकर (ट्रान्स कॅटेगरी) हे या सोहळ्याचे मानकरी ठरले.या कार्यक्रमास अझाझ चारनिया,रामेश्वर वाघमोडे, पूनम अजय लांडगे, छाया प्रकाश,लीना मुंडलिक, स्नेहा केदारी,सुप्रिया पवार यांनी सपोर्टिंग पार्टनर म्हणून पाठिंबा दिला.

## दत्तजयंतीनिम्मित अखंड नामजप सामुदायिक गुरुचरित्र पारायण सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** श्री स्वामी समर्थ महाराज व अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरूपीठ त्र्यंबकेश्वर चे पिठाधीश परमपुज्य श्री गुरूमाऊली यांच्या कृपा आशीर्वादाने व आदरणीय युवासंत चंद्रकांत दादासाहेब यांच्या परवानगीने श्री दत्त जयंती अखंड जप नाम यज्ञ सप्ताह श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र समर्थ नगर लोणार येथे दि.20/12/2023ते 27/12/2023 पर्यंत आयोजित करण्यात आला होता .या सप्ताह मध्ये सामुदायिक गुरूचरित्र पारायण,प्रहर सेवा, गणेश याग, चंडी यांग, रुद्र याग, मल्हारी सप्तशती पठण, दुर्गा सप्तशती पठण, यांसारख्या विविध ग्रंथ पठण सेवा अखंड पन्हे सुरू होत्या. प्रहर सेवेमध्ये दोन सेवेकरी स्वामी चरित्र सारामृत पठण, दोन सेवेकरी श्री स्वामी समर्थ या मंत्राचा जप, दोन सेवेकरी विना वादन करून श्री स्वामी समर्थ मंत्र जप सेवा अखंड पणे करत होते .आज या सप्ताहाची समाप्ती झाली आहे. लोणार शहरातील सामुदायिक श्री गुरुचरीत्र पारायणास सुरूवात झाली तेव्हा पासून 141 पारायण करणारे सेवेकरी यांनी सहभाग घेतला आहे.प्रहर सेवा देखील सुरू होत्या .या मध्ये सकाळी 8 ते रात्री 8 पर्यंत महिला सेवेकऱ्यांनी सेवा दिली तर रात्री 8 ते सकाळी 8 पर्यंत पुरुष सेवेकऱ्यांनी सेवा दिली. या नंतर ही जास्तीत जास्त लोकांनी या सेवेमध्ये सहभाग घेऊन अतिउच्च कोटींची सेवा श्री स्वामी समर्थ महाराज व परमपुज्य श्री गुरूमाऊली यांच्या चरणी रुजू केली . आपली कोणतीही समस्या सोडविण्याचे सामर्थ्य या दिंडोरी प्रणित स्वामी समर्थ सेवा मार्गात असून आपल्या समस्येवरील अध्यात्मिक मार्गदर्शन साठी श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र समर्थ नगर लोणार येथे डॉ सुशील अग्रवाल यांच्या शी संपर्क साधावा असे आवाहन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र लोणार यांच्या मार्फत करण्यात आले आहे. खूप कालावधी पासून लोणार परिसरात श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र सुरू असून हजारो सेवेकरी श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाला जोडले गेले आहेत. समस्या अनुरूप मार्गदर्शन घेऊन समस्या सूटल्याचे अनुभव हजारो सेवेकरी घेत आहेत. आज या सप्ताह चा शेवटचा दिवस होता आज सकाळी पासून केंद्र मध्ये गर्दी पहावयास मिळाली 10 ,30 च्या मंगल आरती नंतर महाप्रसाद चे वाटप करण्यात आले त्या मध्ये हजारो भक्तांनी लाभ घेतला. श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र लोणार येथे दर गुरुवारी व रविवारी संध्याकाळ च्या आरती नंतर प्रश्न उत्तरी घेण्यात येते ,याचा लाभ सुद्धा जास्तीत जास्त भक्तांनी घ्यावा असे अवाहन लोणार केंद्र कडून करण्यात आले आहे





## स्वयंसहाय्यता महिला गटाच्या शाश्वत विकासासाठी प्रशिक्षण शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** महिला बचत गटांना सक्षम करण्याच्या दृष्टीकोनातून निवड झालेल्या महिला बचत गटांना कारंजा येथे नुकतेच तीन दिवसीय प्रशिक्षण शिबीर पार पडले आहे. सदर शिबिरात सोया आधारित पुरक अन्न उत्पादने व रोजगार निर्मिती बाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे. आपल्याला सोयाबीन मूल्यवर्धनामध्ये मोठा टप्पा गाठणे गरजेचे आहे. सोयाबीन दूध, प्रोटीन पावडर ,पौष्टिक पूरक आहार अशा विविध प्रक्रिया पदार्थांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मागणी आहे. उत्कृष्ट पोषणमूल्य असलेले सोयाबीन हे पीक शेतकऱ्यांमध्ये अल्पावधीत लोकप्रिय झाले. वाशिम जिल्ह्यामध्ये मोठ्या क्षेत्रावर सोयाबीनची लागवड केली जाते. हीच बाब लक्षात घेवून कृषी विज्ञान केंद्र वाशिम ने जिल्हा नियोजन समिती व आत्मा वाशिम यांच्या आर्थिक साहाय्याने स्वयंसहाय्यता महिला बचत गटाच्या शाश्वत विकासासाठी सोया आधारित पूरक अन्न उत्पादने रोजगार निर्मिती हा प्रकल्प कारंजा लाड तालुक्यात राबवत आहे. त्याच अनुषंगाने लाभार्थी महिला बचत गटांना सक्षम करण्याच्या दृष्टीकोनातून महिला बचत गटांची निवड झालेल्या गटांना दिनांक 20 ते 22 डिसेंबर 2023 रोजी गुरुदेव सेवा आश्रम शांती नगर कारंजा लाड येथे तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमाचे उद्घाटन कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. आर. एल.काळे, गृहविज्ञान शाखेचे प्रमुख शुभांगी वाटाणे, व श्री सुनील दशमुखे यांच्या उपसथितीमध्ये पार पडला. यावेळी डॉ काळे यांनी मुख्यत्वे सोयाबीन लागवड तंत्रज्ञाना बाबत विविध संशोधन केले जाते परंतु अजूनही आपल्याला सोयाबीन मूल्यवर्धनामध्ये मोठा टप्पा गाठणे बाकी आहे. सोयाबीन दूध, प्रोटीन पावडर ,पौष्टिक पूरक आहार अशा विविध प्रक्रिया पदार्थांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मागणी आहे असे संबोधित करीत याच अनुषंगाने बचत गटाने काम करून स्वयंरोजगार निर्मिती करावी असे आवाहन केले. शुभांगी वाटाणे यांनी सोयाबीनपासून सोया-दूध, सोया पनीर, पीठ आणि टोफूसारखे सोया आधारित पदार्थ तयार केले जातात. मांस आणि दुग्धजन्य पदार्थाला पर्याय म्हणून सोयाबीनचे सेवन केले जाते. म्हणून महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी हे तंत्रज्ञान या प्रकल्पाच्या माध्यमातून होणाऱ्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून अवगत करावे या करिता सोया दूध, टोफू , सोया चकली, सोया पीठ व त्यापासून तयार होणारे विविध रेडी टू ईट पदार्थ तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून घेतले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# काव्यमहोत्सवांतून वृत्तबद्ध कवितांचे सादरीकरण होणे आवश्यक : प्रा. डॉ. चिमोटे

## काव्यप्रेमी शिक्षक मंचाचा राज्यस्तरीय काव्यमहोत्सव उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** काव्यप्रेमी शिक्षक मंच आणि पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चौदावा राज्यस्तरीय काव्यमहोत्सव स्थानिक अमरावती विद्यापीठातील डॉ.के.जी. देशमुख सभागृहात नुकताचं दि.23 व 24 डिसेंबर रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रा.डॉ.मोना चिमोटे, मराठी विभाग प्रमुख संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, ह्या तर महोत्सवाध्यक्ष म्हणून जेष्ठ साहित्यिक व सुप्रसिद्ध गझलकार श्री बबन सराडकर,स्वागताध्यक्ष श्री आनंद घोडके राज्याध्यक्ष काव्यप्रेमी शिक्षक मंच तर प्रमुख अतिथी म्हणून मा. प्रवीण जानोरकर, संत गाडगेबाबा यांचे वंशज, प्रा.डॉ.हेमंत खडके, प्रा.डॉ.मनोज तायडे,प्रा. डॉ.प्रणव कोलते, तसेचं काव्यप्रेमी शिक्षक मंचाचे राज्य सचिव कालिदास चवडेकर, राज्य उपाध्यक्ष पी.नंदकिशोर,राज्यसहसचिव दीपक सपकाळ, कोषाध्यक्ष कृष्णा शिंदे, प्रमोद बाविस्कर, कमलाकर संखे, राजेश चौधरी, राजेश साबळे विजय बिंदोड, मुकेश विशे, जया नेरे, विशाल अंधारे, विजया पाटील, सरला साळुंखे, वर्षा भांदर्गे आदि मान्यवर उपस्थित होते.



साहित्यातून समाज प्रबोधन होणे हे तेवढेचं गरजेचे असून त्यासाठी अशा प्रकारचे राज्यस्तरीय काव्यसंमेलन होणे तितकेचं महत्वाचे आहे.मात्र हल्ली मुक्तछंदातील कवितांमुळे वृत्तबद्ध कवितांचे स्वरूप हरवत चालले आहे. या कवितांचे लेखन व सादरीकरण फार कमी प्रमाणात होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना वृत्तबद्ध कविता अधिक चांगल्या प्रकारे शिकता याव्यात यासाठी काव्यमहोत्सवांतून वृत्तबद्ध कवितांचे सादरीकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. असे प्रतिपादन सन्माननीय अध्यक्षा मोना चिमोटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले.तर कवितेतून वैचारिक मंथन होणे गरजेचे आहे.असे प्रतिपादन महोत्सवाध्यक्ष श्री बबन सराडकर यांनी केले.

काव्याकरिता बोलीभाषेचे संवर्धन व उपाययोजना हा परिसंवाद देखील अतिशय लक्षवेधी ठरला. महाराष्ट्रातील विविध बोलीभाषांतील भाष्यकारांनी आपापल्या बोलीभाषेचे संवर्धन करण्याची कशी गरज आहे आणि त्यासाठी करता येणाऱ्या उपाययोजना यावर प्रकाश टाकला.बोलीभाषा टिकेल तरचं खऱ्या अर्थाने मराठी भाषेचं संवर्धन होऊ शकेल, असा सूर या महोत्सवातून उमटला.या परिसंवादाचे यशस्वी सूत्रसंचालन विशाल कन्हेरकर यांनी केले. अतिशय उत्साहात संपन्न झालेल्या काव्यप्रेमी शिक्षक मंचाच्या राज्यस्तरीय काव्यमहोत्सवासाठी अमरावती जिल्हाध्यक्षा सौ.वर्षा भांदर्गे,सीमा भांदर्गे,खुशाल गुल्हाने,राजेश चौरपगार,गणेश खडके, प्रमोद घाटोळ, आबासाहेब कडू, विणा जोशी, शरद राऊत,वंदना विंचूरकर,कैलास कापडे, वर्षा पन्नासे,शुभांगी निंबोळे, सुलोचना लडवे,अंजली वारकरी, श्याम चौकडे, सुरेंद्र वाडेकर, रंजना कराळे, कुमुद कोरडे,शैला चेडे, प्रमोद भागवत,मंजू वणवे, अर्चना गुल्हाने,महेश राजूरकर,शीतल अथाटे, विशाल मोहोड,अजय अडीकने, यश इंगळे,संजय देशमुख, गायत्री पुनकर, तेजस्विनी लोखंडे,नीता कचवे, शारदा गणोरकर, छाया शहाणे,स्वाती वानखडे,लोमेश खैरकर, कल्पना लांडे,आदी अमरावती जिल्हा कार्यकारिणीतील सदस्यांसह विद्यापीठातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी परीश्रम घेत कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे योगदान दिले.



# नक्षलग्रस्त भागातील शिक्षण व आरोग्य सुविधांवर निधी खर्चास प्राधान्य : जिल्हाधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी प्राप्त होणाऱ्या निधीपैकी 75 टक्के निधी अतिसंवेदनशील तालुक्यासाठी वितरीत करावा व त्यात शिक्षण, आरोग्य व पिण्याच्या पाण्यावर प्राधान्याने खर्च करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी विनय गौडा. जी.सी. यांनी आज दिल्या. नक्षलग्रस्त भागाच्या विकासासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत निधी खर्चाचा आढावा जिल्हाधिकारी यांनी आज घेतला. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, जिल्हा नियोजन अधिकारी राजू कळमकर, पोलिस उपअधिक्षक राधिका फडके, शिक्षणाधिकारी (प्राथमीक) राजकुमार हीवरे प्रामुख्याने उपस्थित होते. चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण नऊ तालुके नक्षलग्रस्त भागात येतात. यात जिवती, राजूरा, कोरपणा व गोंडपिंपरी हे तालुके अतिसंवेदनशील असून चंद्रपूर, बल्लारपूर, पोंभूर्णा, मूल व सावली हे तालुके नक्षल प्रभावीत संवेदनशील तालुके आहेत. या भागातील विकासासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत उर्वरित निधीच्या मागणीसाठी पाठपूरावा करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या. बैठकीला संबंधीत विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# शासकीय परिपत्रकाची होळी, अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा संताप

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** राज्यातील अंगणवाडी सेविकांचे गेल्या २३ दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी बेमुदत संप पुकारला आहे. मात्र शासनाने अंगणवाडी सेविकांच्या मागण्या पूर्ण करण्याऐवजी त्यांना नोकरीवरून कमी करण्याचे परिपत्रक काढल्याने या कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. येथील अंगणवाडीताईंनी शासनाच्या परिपत्रकाची होळी करून निषेध व्यक्त केला. शासनाच्या निर्णयाला विरोध दर्शवित हाती चप्पल घेऊन नारेबाजी केली. गेल्या ४ डिसेंबरपासून अंगणवाडीताई बेमुदत संपावर आहे. जिल्ह्यातील अंगणवाड्या बंद आहे. बालकांचे पोषण व जडणघडण करण्यासोबतच राज्य शासनाच्या सर्व योजना नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अंगणवाडी सेविका व मदतनीस करीत असतात. शालेय पूर्व अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांचा पोषण आहार ही सर्व कामे बेमुदत संपामुळे बंद आहेत. अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे पद वैधानिक असल्याने त्यांना शासकीय कर्मचारी घोषित करून वेतन देण्यात यावे. वेतनश्रेणी, भविष्य निर्वाण निधी, सामाजिक सुरक्षा, आदी सर्व लाभ देण्यात यावे. अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविकांना दरमहा २६ हजार रुपये व मदतनिसांना २० हजार रुपये दरमहा मानधन देण्यात यावे, यासह विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी कर्मचारी २३ दिवसांपासून बेमुदत कामबंद आंदोलन करत आहे. शुक्रवारपर्यंत आंदोलनाची पूर्तता न झाल्यास अंगणवाडी सेविका जेल भरो आंदोलन करणार आहे. या आंदोलनात अशोक भुतडा, विजया सांगळे, पल्लवी रामटेके, जया सावळकर, अनिता कुलकर्णी, हुकूम ठमके, विजया जाधव, लीला काळे, आशा काळे, रमा गजभार, रचना जाधव,रुख्मिणा पवार, अनुसया गायकवाड, कविता कदम, लता माटे, ज्योती येराकार, मनीषा कुटे, प्रमिला मलकापुरे, प्रणिता राजूरकर, सुनीता पवार, अलका भागवत, चंदा लिंगणवार आदी सहभागी झाले होते.

# रयत शिक्षण संस्थेचा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार आशा डांगे यांना जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कवयित्री आशा अशोक डांगे यांना रयत शिक्षण संस्थेचा पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार जाहीर झाला आहे. रयत शिक्षण संस्थेच्या दादा पाटील महाविद्यालय कर्जत जिल्हा अहमदनगर यांच्या वतीने स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले यांच्या विचारांना उजाळा मिळावा स्त्री सक्षमीकरणाचा जागर व्हावा म्हणून दादा पाटील महाविद्यालय कर्जत यांच्या वतीने दरवर्षी स्त्री शिक्षिका साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते या संमेलनात महाराष्ट्रातील स्त्री शिक्षिका साहित्यिक सहभागी होत असतात स्त्री शिक्षकांना सशक्त विचारपीठ उपलब्ध करून देण्याबरोबरच महिलांचे अर्थविश्व व नवतंत्रज्ञानाच्या जाणिवा समृद्ध करण्यासाठी आणि मराठी साहित्य विश्वाकडून स्त्री शिक्षकांच्या असलेल्या अपेक्षांची जाणीव करून देण्यासाठी स्त्री शिक्षिका साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते. त्याचबरोबर विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या, सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवणाऱ्या शिक्षिकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते . यामध्ये राजमाता जिजाऊ पुरस्कार पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर पुरस्कार सावित्रीबाई फुले पुरस्कार फातिमा शेख पुरस्कार कार्यभाई शिंदे पुरस्कार रखमाबाई राऊत पुरस्कार मुक्ता साळवे पुरस्कार दुर्गा भागवत पुरस्कार इत्यादी स्त्री सुधारकांच्या , कर्तुत्ववान स्त्रियांच्या नावाने पुरस्कृत केले जाते. पैकीश पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार छत्रपती संभाजी नगरच्या कवयित्री आशा अशोक डांगे यांना जाहीर झाला आहे. आशा डांगे या बळीराम पाटील विद्यालयांमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत आहे. अशा डांगे या प्रगतिशील लेखक संघाच्या महाराष्ट्र राज्याच्या सहसचिव म्हणून सुद्धा कार्य करत आहेत .यापूर्वी त्यांना डॉ .बाबासाहेब आंबेडकर साहित्य गौरव पुरस्कार, शब्दगंध साहित्य पुरस्कार , झेप साहित्य पुरस्कार , पुरोगामी साहित्य मंडळाचा पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या संमेलनाचे निमंत्रक मा. आ. रोहित दादा पवार हे आहेत. या संमेलनाचे स्वागत अध्यक्ष व रयत शिक्षण संस्थेचे सदस्य माननीय राजेंद्र तात्या फाळके हे आहेत सदर पुरस्कार बुधवार दिनांक 3 जानेवारी 2024 रोजी दुसऱ्या स्त्री शिक्षिका साहित्य संमेलनामध्ये करण्यात येणार आहे. आशा डांगे यांचे या उपलब्धी बद्दल व. ना. शि. प्र. चे अध्यक्ष माननीय राजाराम राठोड सचिव नितीन जी राठोड उपाध्यक्ष अँड अभय राठोड ,कोषाध्यक्ष डॉ बिपिन राठोड, मुख्याध्यापक एम बी श्रीमंगले तसेच विद्यालयातील शिक्षक व इतर साहित्यिक वर्तुळाकडून अभिनंदन केले जात आहे



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर